नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी




कै. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

वर्ष २४ अंक ३

जुलै १९६९

अनुक्रमणिका



साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या स्मृतीस

"युगवाणीचे"चे अभिवादन

अनुक्रमणिका

संपादकीय

आपली मायभूमी आणि आपली मायभाषा यांवर अमर्याद प्रेम करणारा एक प्रचंड कर्तृत्वाचा साहित्यिक म्हणून उभा महाराष्ट्र आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना ओळखतो. केवळ, साहित्यात रुची घेणाऱ्या सुशिक्षितांच्या वर्गापर्यंतच आचार्य अत्र्यांची लोकप्रियता मर्यादित नव्हती, तर अर्धशिक्षित आणि अशिक्षित अशा मराठी जनतेनेही त्यांचे अमाप कौतुक केले. केवळ साहित्य–क्षेत्रातच आपली लेखणी गाजविणाऱ्या 'साहित्यिका'ला अशी एवढी लोकप्रियता क्वचितच मिळते.

आचार्य अत्र्यांनी साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण केले ते एक कादंबरी लिहून. 'मोहित्यांची मंजुळा' हे त्या कादंबरीचे नाव. पुढे, अलीकडच्या काळात त्यांनी 'चांगुणा' नावाची आणखी एक कादंबरी प्रसिद्ध केली. पण, कादंबरीकार म्हणून काही ते ओळखले जात नाहीत. ललित वाङमयाच्या 'कादंबरी' या प्रकारात त्यांनी कधी फारसे मनच घातले नाही. या गोष्टीचे मर्म आचार्यांच्या स्वभाववैशिष्ट्यात असावे. जीवनातील आणि मनुष्य–स्वभावातील विसंगती, खुळचटपणा, हास्यास्पदता अचूकपणे टिपून काढणे हा श्री. अत्र्यांचा एक स्वभाव–विशेष होता आणि म्हणूनच त्यांनी विडंबन–काव्याने आपल्या साहित्यिक जीवनाला खरी खरी सुरुवात केली असे म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या 'झेंडूची फुले' या विडंबनपर कवितासंग्रहाने मराठी कवितेच्या क्षेत्रात एक नवा पायंडा घालून दिला, हे निर्विवाद सत्य आहे.

हीच गोष्ट पुढे श्री. अत्र्यांच्या नाटकांनीही सिद्ध केली. काव्यापेक्षा रंगभूमीचे क्षेत्र अधिक प्रभावकारी व सोईस्कर म्हणून त्यांनी 'साष्टांग नमस्कार' नाटक लिहून आपल्या नाटककाराच्या जीवनाला प्रारंभ केला आणि तो अनेक वर्षे अव्याहतपणे आणि चढत्या यशस्वीपणाने चालू ठेवला.

मध्यंतरीच्या कालखंडात श्री. अत्र्यांनी शिक्षणक्षेत्रातही बहुमोलाची कामगिरी केली. नवीन शिक्षण–संस्था काढणे, आपल्या कर्तृत्वाने ती भरभराटीस आणणे, विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके कशी असावीत याचा आदर्श घालून देणे, शिक्षणक्षेत्रात जास्तीत जास्त प्राविण्य मिळविण्यासाठी इंग्लंडची वारी करून तेथून 'टी. डी.' ची पदवी प्राप्त करून येणे, इत्यादी गोष्टी पाहिल्या म्हणजे, श्री. अत्र्यांची इच्छा स्वतःला शिक्षणकार्यालाच वाहून घ्यावे अशी असावी की काय, असे वाटू लागते.

श्री. अत्र्यांनी चित्रपटसृष्टीतही निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक म्हणून जी कामगिरी केली ती तशीच महनीय आहे. या क्षेत्रात एवढे यश आणि गौरव प्राप्त करून घेणारा हाच पहिला मराठी माणूस, असे म्हटले तर ते यथार्थच ठरेल.

पुढे श्री. अत्र्यांनी वृत्तपत्र–व्यवसायात प्रवेश करावयाचे ठरविले. त्यांनी चालविलेली 'नवयुग', तुकाराम', 'समीक्षक' आदी नियतकालिके अतिशय गाजली आणि लोकप्रियही झाली. पण 'वृत्तपत्रकार' म्हणून त्यांनी चालविलेले 'मराठा' हे दैनिक ह्या दृष्टीने अजोडच म्हणावे लागेल.

"भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथी हाणू सोटा" हे आपले ब्रीदवाक्य अत्र्यांच्या 'मराठ्या'ने तंतोतंत शेवटपर्यंत पाळले. अन्यायाचा सर्व सामर्थ्यानिशी प्रतिकार करणे, त्यासाठी प्रसंग पडला तर स्वतःवर संकटे ओढवून घेण्यासाठी मागे–पुढे न पाहाणे, हा अस्सल मराठी बाणा अत्र्यांनी अत्यंत निर्भयपणे व साहसी वृत्तीने शेवटपर्यंत चालविला. ज्यांचा कोणी वाली नाही, कैवारी नाही, जे स्वतः अन्यायाखाली दडपले जात आहेत पण ज्यांच्या अंगी ह्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची शक्ती नाही, अशा लोकांचा एक समर्थ कैवारी म्हणून 'मराठ्या'च्या ह्या संपादकाकडे कितीतरी लोक पाहात असत. सार्वजनिक जीवनातील ही प्रचंड शक्ती आज काळाने आपल्यापासून हिरावून नेली आहे !

अशा तऱ्हेने जीवनातल्या अनेकविध क्षेत्रांत प्रचंड कामगिरी करणारे आचार्य अत्रे आज आपल्यात नाहीत ! एक उमदा माणूस आपल्याला सोडून गेला आहे ! एक सच्चा 'मराठा गडी' आपल्याला सोडून गेला आहे ! एक थोर प्रतिभाशाली साहित्यिक आपल्याला सोडून गेला आहे ! 'युगवाणी'ला ह्या गोष्टीचे अतिशय दुःख आहे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

२४] जुलै १९६९ [अंक ३

संपादक
शं. वा. शास्त्री

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

कोल्हटकरांचे जळगांव येथील जीवन

ले. श्री. द. बा. महाजन, ॲटव्होकेट, यवतमाळ

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, यवतमाळचे कायदेपंडित आणि शारदाश्रमाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. द. बा. ऊर्फ बाबासाहेब महाजन यांनी लिहिलेल्या कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या आठवणी पुढे दिल्या आहेत. —संपादक

साहित्यसम्राट तात्यासाहेबांचा व माझा परिचयच नव्हे, तर घरोबा व्हावा, हे मी माझे पूर्व संचितच समजतो. नाही तर, त्यांच्यासारख्या थोर साहित्यिकाशी माझ्यासारख्या अगदी सामान्य माणसाचा इतका निकट संबंध येण्यासारखे माझ्या संग्रही असे काय होते ? पण दैवी योगायोग म्हणतात तो हाच ! तात्यासाहेबांच्या प्रेमळ सान्निध्यात घालविलेली ती जळगाव–जामोद येथील तीन वर्षे म्हणजे माझ्या जीवनातील अविस्मरणीय असा काल होय.

जळगांवमधील बिकट परिस्थिति

१९२७ ची ती गोष्ट ! माझी पहिली नेमणूक नायब तहसिलदार म्हणून झाली, ती वऱ्हाडात–तात्यासाहेबांच्याच–जळगावी. त्या वेळी जळगाव–जामोद हे वर्तमानपत्रात खूपच गाजले होते. तेथील तहसिलदार श्री. चांदेकर यांच्यावरील खटल्याचा निकाल होऊन त्यात त्यांना जबर शिक्षा झाली होती. जिल्ह्याचे डेप्युटी कमिश्नर श्री. बानर्जी यांच्या कडक व निर्भीड शासनाने जिल्हा हादरून गेला होता. आणि नेमक्या याच वेळेस मला जळगावला कामावर रुजू व्हायचे होते. कॉलेजच्या स्वतंत्र वातावरणात नोकरीची नुसती तोंडओळख देखील झालेली नव्हती. अनुभवी मित्रांचा सल्ला असा पडला की, शक्य तोवर जळगाव टाळावे. पण, मनाची ओढ होती, ती तात्यासाहेबांच्या सान्निध्याची. मी मनात खूप गोंधळलो. तात्यासाहेबांसारख्या विनोदसागराच्या सहवासाच्या दुर्मिळ लाभाची आयती चालून आलेली ही संधी गमावणे इष्ट नाही, याच विचाराने माझ्या मनावर शेवटी तावा केला; व मी दिनांक २६–४–१९२७ रोजी जळगांव येथे बेफिकीरपणे कामावर रुजू झालो. माझ्या पूर्वी त्या जागेवर एक गृहस्थ होते. पण त्यांचे शिक्षण फक्त मॅट्रिकपर्यंतच झालेले. मी विद्वान पदवीधर तरी होतो. त्यामुळे वकील वर्गाकडून व तेथील बहुजनांकडून माझे स्वागत होणे साहजिकच होते. अशा अनुकूल परिस्थितीत मी जळगावला पहिले पाऊल टाकले.

तात्यासाहेबांचे पहिले दर्शन

नेहमीच्या पद्धतीला अनुसरून गावातील सन्माननीय व प्रतिष्ठित नागरिकांच्या भेटीकरता मी बाहेर पडलो; व पहिली भेट अर्थात् तात्यासाहेबांचीच घेतली. तसे म्हटले, तर तात्यांचा व माझा पूर्व परिचय मुळीच नव्हता, असे नाही. इ. स. १९२४ साली फर्ग्युसन कॉलेजमधील वैदर्भीय विद्यार्थ्यांच्या वार्षिक संमेलनाचे अध्यक्षस्थान तात्यांनी विभूषित केलेले होते. त्या वेळी मी त्यांना यवतमाळचा एक विद्यार्थी म्हणून मुद्दाम भेटलो होतो. हे संमेलन खूपच गाजले. या संमेलनात त्या वेळी आमच्याच वयाचे असलेले श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे त्यांच्याबरोबर होते. 'आधुनिक कविपंचका'वर अत्यंत मार्मिक व काव्यरसविश्लेषण करणारे परीक्षणात्मक निबंध

लिहून त्यांनी साहित्यक्षेत्रात त्या वेळी खूपच नाव गाजविले होते. त्याशिवाय ज्ञानकोशकार डॉ. केतकर, रविकिरण मंडळातील कवि व साहित्यिक रानडे दांपत्य, महाराष्ट्रकवि यशवंत, गिरीश इत्यादि मंडळीही संमेलनाला उपस्थित होती. त्या गर्दीतच मीही, तात्यासाहेबांना भेटण्याची संधी साधून, अगदी सर्वांची नजर चुकवीत, माझ्या "फिरते कारंजे" या कवितेचे छापील कात्रण त्यांना देण्याचे धाडस केले होते; व ते कात्रण स्वीकारतांना त्यांनी माझी विचारपूसही केली होती. हेच त्यांचे पहिले दर्शन!

आश्चर्याचा गोड धक्का

पण आता या गोष्टीला ३–४ वर्षे लोटली होती. तरी पण माझ्या पहिल्याच भेटीत तात्यांनी अत्यंत आपुलकीने माझे स्वागत केले; व तेथे बसलेल्या श्री. कोठारे वकिलांना उद्देशून ते म्हणाले, "अहो, हे नवे नायब तहसिलदार कवी आहेत बरं का?" आणि त्यांनी लागलीच आपल्या कपाटातून मी त्यांना संमेलनाच्या वेळी दिलेले कात्रण काढले; व मला आश्चर्याचा पहिला धक्का दिला. माझ्यासारख्या यःकश्चित् विद्यार्थ्याची कविता एवढ्या थोर साहित्यिकाने जपून ठेवावी, हे पाहून मी तर भारावून गेलो. त्या वेळी त्यांच्या थोर अंतःकरणाचे मला प्रथमच दर्शन घडले. त्या क्षणापासून त्यांच्या सहवासात मला एक प्रकारचा अपूर्व आनंद व आत्मीयता वाटू लागली; व जोपर्यंत मी जळगावात होतो, तोपर्यंत तात्यांच्या सहवासाचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचा मी बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला.

तात्यांची वकिली

तात्यासाहेब हे फौजदारी किंवा मुलकी कोर्टात वकिलीचे काम करीत नसत. त्या वेळी मुलकी अधिकाऱ्यांना फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार असे. मुलकी अधिकारी जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिकलेले सापडायचे. शिवाय, त्यांचे विचित्र व अरेरावी स्वभाव, त्यांच्या काम करण्याच्या पद्धती, कोर्टाच्या वेळा, वकीलवर्ग व पक्षकार यांच्याशी वागण्याच्या तऱ्हा काही औरच असावयाच्या. अशा परिस्थितीत, तात्यासाहेबांसारख्या स्वाभिमानी वकिलाला, त्यांच्यासमोर लीनतेने उभे राहून, त्यांच्या लहरीप्रमाणे काम चालविणे केवळ अडचणीचेच नव्हे, तर कमीपणाचेही वाटणे साहजिकच होते. मुलकी अंमलदाराच्या कोर्टात पाऊलही न टाकलेले अनेक सुप्रतिष्ठित व नामांकित कायदेपंडित आजही वऱ्हाडांत हयात आहेत. तात्यांनी दिवाणी प्रमाणे फौजदारी कोर्टाची कामे केली असती, तर त्यांना निस्संशय अधिक पैसा मिळविता आला असता. परंतु त्यांच्या स्वाभिमानी मनाला ते रुचले नाही. शिवाय, पायांना असलेल्या इसबाच्या विकारामुळे, त्यांना अनेक कोर्टात पायपीट करणेही क्लेशकारक होत असे. म्हणून त्यांनी वकिलीचे कार्यक्षेत्र दिवाणी कोर्टापुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळेच, त्यांच्या हातून साहित्यक्षेत्रात एवढी प्रचंड व अपूर्व कामगिरी होऊ शकली, यांत शंका नाही.

वादीचे वकील

तात्यासाहेब हे वादीचे वकील म्हणूनच प्रसिद्ध होते. त्यांचे पक्षकार बहुतेक दुकानदार, सावकार व मारवाडी असत. प्रतिवादीच्या वकिलाच्या मनाची ठेवण काही वेगळीच असावी लागते. त्यांच्या युक्त्या प्रयुक्त्या, लटपट व विशिष्ट तंत्र हे तात्यासाहेबांच्या सरळ स्वभावाला कुठून साधणार? त्यांनी चालविलेले दिवाणी खटले मी पाहिलेले आहेत. त्यांच्या प्रतिपरीक्षणात कुशाग्र बुद्धी, मानवी स्वभावाचे निरीक्षण, पद्धतशीरपणा, अभ्यासू वृत्ती व त्यांचा जन्मजात विनोद हे प्रतीत होत. सावकारी खातेवह्या, चोपड्या, हिशेब वगैरे तपासण्यात त्यांचा हातखंडा होता. याच विस्तृत अनुभवातून त्यांचे 'साक्षीदार' व 'चोरांचे संमेलन' हे विनोदी लेख निर्माण झाले आहेत. जिल्ह्यातील एक निष्ठावंत, सचोटीचा, बुद्धिमान व सज्जन वकील म्हणून त्यांचा लौकिक होता.

सहज बोलता बोलता मी तात्यासाहेबांना एक वेळ म्हटले की, "चोरांच्या संमेलनाचे अध्यक्षपद, शिक्षा भोगून आलेल्या रामोशाला देण्यापेक्षा, सर्व काही करून सवरून मोकळ्या असलेल्या पोलीस ऑफिसरला देणे जास्त शोभले असते." त्यावर तात्यासाहेबांनी हास्य केले व ते म्हणाले, "मी त्याच्याविषयी केव्हा तरी लिहीनच."

वऱ्हाडच्या पक्षकाराचा धूर्तपणा

दुसऱ्या एका प्रसंगी तात्यासाहेबांना मी म्हणालो, "तात्यासाहेब, मला या नोकरीत वाचायला किंवा लिहायला वेळच मिळत नाही. तेव्हा ही कटकटीची नोकरी सोडून मला वकिलीच करावीशी वाटते. म्हणजे फुरसत मिळेल." तेव्हा तात्यासाहेबांनी असे काही उपहासात्मक हास्य केले की, माझे मन चर्र झाले. ते दृश्य आजही माझ्या मनःचक्षूंसमोर जसेच्या तसे उभे राहाते. ते म्हणाले, "तुम्ही वकील झालात की वेळच वेळ मिळेल!" तात्यासाहेबांचे हे उपहासात्मक हास्य अत्यंत बोधप्रद होते. ते नेहमी म्हणत की, "वऱ्हाडचा पक्षकार हा प्राणी आताशा फार धूर्त झालेला आहे. त्याचा वकील कविता करतो, नाटके लिहितो, गाण्याच्या मैफलीस जातो, याचा नुसता सुगावा लागला, तर तो पुन्हा त्या वकिलाच्या घराची पायरी चढणार नाही. माझे लिखाण मी शक्य तोवर त्यांना चोरूनच लिहिलेले आहे"

बाररूम नव्हे, विनोदमंदिर

तात्यासाहेब हे वकील म्हणून माझ्या कोर्टात कधीच आले नाहीत. पण मी मात्र थोडासा वेळ सापडताच बाररूममध्ये जाऊन, त्यांच्या मैफलीत भाग घेऊन, हास्यविनोदाचा आनंद मनमुराद लुटला आहे. कोणताही श्रेष्ठ साहित्यिक घ्या. त्याला स्वतःच्या भोवती एक विशिष्ट मित्रमंडळ असते. त्याच्या सहवासात तो "मस्तान" असतो. तात्याही या नियमाला अपवाद कसे राहातील? जळगावसारख्या छोटयाशा तालुक्याच्या ठिकाणी वकीलमंडळ ते केवढे असणार? पण, येथील वकीलमंडळ लहानसे असले, तरी ते वैशिष्टयपूर्ण होते, यात शंका नाही. तात्यांच्या प्रतिभेच्या स्पर्शाने या मंडळातील साहित्यप्रेमी व रसिक मंडळीच्या बुद्धीला एक प्रकारचा उजाळा लाभलेला होता; व तात्यासाहेब हे त्यांचे स्फूर्तिस्थान होते. त्यांच्यापासून त्यांनी प्रेरणा घेऊन वाङ्मयक्षेत्रात कमी अधिक कामगिरी बजावली आहे. त्यांपैकी प्रामुख्याने श्री. केशवराव जोशी हे लघुकथालेखक, श्री. सोमण हे ज्ञानेश्वरीचे अभ्यासक, श्री. धोपेश्वरकर व श्री. सुंदरराव कोठारे हे मार्मिक समीक्षक यांची नावे सांगता येतील. बाररूममधील वातावरण साहित्यचर्चा, विनोद, कोटया यांनी नेहमी आनंदित व उत्साहित असावयाचे. तात्यासाहेबही त्यात अगदी मनमोकळेपणाने सामील व्हावयाचे. चर्चेचे विषय काय विचारता? मनास येईल तो विषय व तोंडात येतील ते शब्द व कोटया! तात्यांच्या विलक्षण कोटयांची नेहमी मेजवानी झडायची. म्हणजे ही बाररूम नसून तिला विनोदमंदिराचे स्वरूप आले होते. एक वेळ बाररूममध्ये प्रवेश केला, की ती सोडून जाण्याचे अगदी जिवावर येई.

दिवटे सबजज्ज

त्या वेळी जळगाव येथे एक सबजज्ज होते. गृहस्थ तसा सज्जन व स्वभावाने सालस होता. न्यायदानाच्या बाबतीतही त्यांच्याबद्दल फारशी तक्रार नसे. पण स्वारी कचेरीत वेळेवर कधीच यावयाची नाही. त्यामुळे कामाला उशिरा प्रारंभ होऊन कधी कधी कचेरीतच दिवे लागावयाचे. या दीर्घसूत्री पद्धतीला सर्व वकील अतिशय कंटाळले होते. पण साहेबांना बोलतो कोण? चारचे ठोके पडले म्हणजे पुराव्याचा खटला सुरू व्हायचा. हा प्रकार असह्य होऊन एक दिवस तात्यासाहेब संतापून म्हणाले, "साहेबांच्या खुर्चीखाली असा काही बार भरा, की पाचचे ठोके पडताच त्या खुर्चीने साहेबांस अलगद फेकून द्यावे. म्हणजे ही कटकट तरी थांबेल!" पण, कधी ते विनोदाच्या लहरीत आले, म्हणजे म्हणावयाचे की, "हे पहा, केशवराव, एक पालखी, चार भोई व गॅसबत्त्या बोलावून घ्या. म्हणजे जज्जसाहेबांची गावातून मिरवणूक तरी काढता येईल. स्वारी दिवे लावल्यावाचून कचेरी सोडीतच नाही." त्यामुळे त्यांना 'दिवटेसाहेब' ही पदवी अनायासेच लाभली होती.

साधे जीवन, साधी रहाणी

तात्यासाहेब हे एक ख्यातनाम नाटककार व नामांकित वकील. पण राहावयाचे एका छोटयाशा भाडयाच्या घरात आणि तेही एकटेच. त्यांचा सर्व परिवार खामगावला स्वतःच्या प्रशस्त बंगल्यात रहावयाचा. त्यांचा इमानी व कष्टाळू नोकर शंकर गुजराती हाच तात्यांची सर्व व्यवस्था पाहावयाचा. तसेच स्वयंपाकी, चिटणीस व कारभारी. त्यांची कायद्याच्या पुस्तकांची लायब्ररी काही विशेष नव्हती. तात्यांची रहाणी अगदी साधी. स्वच्छ धोतर, अंगात सदरा, वर बंद

गळ्याचा जयपुरी कोट, डोक्यास जरीकाठी रुमाल, अंगावर उपरणे, पायात मोजे व स्लीपर किंवा फार तर बूट. त्यांना पॅन्ट घालताना मी कधी पाहिले नाही. त्यांचे रुबाबदार व्यक्तित्व मनावर छाप पाडणारे होते. त्यांचे वागणे अगदी सरळ असे. त्यांनी लिहिलेल्या नाटकांच्या कथानकातील गुंतागुंतीचा आढळ त्यांच्या वागण्यात कधीही व्हावयाचा नाही. त्यामुळे पक्षकारांचा त्यांच्यावर अढळ विश्वास व तात्यांचेही त्यांच्याशी वर्तन अत्यंत सचोटीचे होते. तात्यासाहेबांचे रसिक व साहित्यिक चिरंजीव श्री. प्रभाकरपंत जळगावला वडिलांकडे नेहमी येत. तात्यांना ते "पपा" म्हणावयाचे. पितापुत्रांची इतकी खेळीमेळीची वागणूक पाहून व त्यांच्या वेछूट टीका–चर्चा ऐकून मला मात्र आचंबा वाटल्यावाचून राहिला नाही.

तात्यासाहेबांचे संगीतनैपुण्य

तात्यासाहेबांना संगीतशास्त्र अवगत असून गाण्याची फार आवड होती, हे काय मी सांगावयास पाहिजे ? सुटीच्या दिवशी किंवा संमेलनप्रसंगी त्यांच्या गाण्याच्या बैठकींना अनेक वेळा उपस्थित राहून त्या आनंदाचा अनुभव मी घेतला आहे. तात्यासाहेबांच्या सहवासात अवीट गोडी होती. दुर्मुखलेला माणूस आपोआपच आनंदी व्हावयाचा. तात्यांचे आवडते गाणे म्हणजे "ऐसी वनसीया वजाये" हे होय. ते त्यांना अत्यंत तन्मयतेने गाताना मी पाहिले आहे. त्यांच्या तोंडून मी लावण्या ऐकल्या आहेत; व 'बहु असोत सुंदर संपन्न' हे त्यांचे महाराष्ट्रगीतही त्यांच्या मुखातून ऐकण्याचे भाग्य मला अनेक वेळा लाभलेले आहे. आपल्या नाटकातील पदेहि ते तन्मयतेने म्हणत. त्यांच्या चालींविषयी बोलताना श्री. हिराबाई पेडणेकर यांची आठवण ते नेहमी काढीत.

सौ. हिराबाई बडोदेकर यांची भक्ति

जळगावचे प्रसिद्ध नागरिक श्री. दादासाहेब पुंडलीक यांच्या येथील विवाहाच्या प्रसंगी सुप्रसिद्ध गायिका सौ. हिराबाई बडोदेकर या आल्या होत्या. त्याच वेळी बुलढाण्याचे डेप्युटी कमिशनर श्री. लेअर्ड हे मधु–चंद्राकरता पत्नीसह जळगावास आले होते. त्या वेळी मी सौ. लेअर्ड यांना तात्यांचा गौरवपूर्ण शब्दात परिचय करून दिला. त्यांचे व मेमसाहेबांचे बोलणे बराच वेळ चालले होते. त्या बैठकीच्या प्रसंगी हिराबाईंनी तात्यांचा जो आदर केला, तो पाहून तर मी थक्कच झालो. ती गाण्याची बैठक खूपच रंगली. हिराबाई इतक्या दिलखूपपणे क्वचितच गायल्या असतील, असे दर्दी लोकांचे मत पडले. हिराबाई तात्यांना किती मान देत, याची मला त्या वेळी कल्पना आली.

साहित्यिकांच्या भेटी

तात्यांच्या भेटीकरता अनेक साहित्यिक जळगावास यावयाचे. माझे मित्र व थोर साहित्यिक श्री. वा. ना. देशपांडे हे श्री. विश्राम बेडेकर व श्री. हरिभाऊ मोटे यांच्यासह तात्यांच्या भेटीस आले होते. श्री. बेडेकर व श्री. मोटे यांनी काश्मीरचा प्रवास नुकताच संपविला होता. त्यांनी तात्यांकरता काश्मिरी लोकरीचे अत्यंत मुलायम बूट व उत्कृष्ट हातमोजे आणले होते. त्यांनी तात्यांस ते भेटीदाखल दिले. त्या वेळी तात्या म्हणाले, "आमच्या शंकरला गीता आणि जोडे एकाच बॅगमध्ये सोवळचात ठेवण्याची सोय झाली!"

ही साहित्यिक मंडळी तात्यांकडे किती तरी वेळ बोलत होती. हास्यविनोदाला नुसता बहर आला होता. त्या प्रसंगी तात्यांच्या मनात श्री. वामनराव देशपांडे यांच्याबद्दल किती आत्मीयता होती, याची मला कल्पना आली.

जिव्हाही चोखंदळ होती

वरील साहित्यिकांचा मुक्काम अर्थात् माझ्याकडे होता. पाहुण्यांबरोबर तात्यासाहेबांनाही मी भोजनास निमंत्रित केले होते. त्या वेळी तात्यांच्या खाद्यपदार्थांच्या आवडी निवडीची कल्पना आली. साहित्यनिर्मितीत शब्दाशब्दाची निवड करणारे हे साहित्यसम्राट जेवतानासुद्धा तितक्याच चोखंदळपणे साध्या चटणी पासून तो मुख्य पदार्थापर्यंत निवडानिवड करताना आढळून आले. त्यांना कांद्याचे लोणचे, शेंगदाण्यांची पातळ भाजी व ओल्या नारळाची आमटी फार चवदार वाटली व खूप आवडली. ती इतकी की, मी त्यानंतर खामगावला त्यांच्याकडे भोजनास गेलो असता, तात्यांनी त्या पदार्थांची माईंच्या (आपल्या पत्नीच्या) समोर पुन्हा आठवण करून दिली.

अनुक्रमणिका

तात्यांच्या आवडीनिवडी काही विशेष होत्या. त्यांना गोड पदार्थांचे आकर्षण नव्हते. पण, खोवऱ्याची चटणी, निरनिराळ्या कोशिंबिरी, दाण्यांची आमटी, कांद्याचे लोणचे याची भारी आवड. त्यांच्या सौन्दर्यपिपासु मनाप्रमाणे जिव्हाही रसग्राही आणि फार चोखंदळ होती.

येथे आणखी नमूद करावयाचे म्हणजे तात्यांना मांसाहार निषिद्ध नव्हता. त्यांनी मांसाहाराची रुची चाखलेली होती, हे ते स्पष्टपणे बोलून दाखवीत. पण त्यात त्यांना खरा स्वाद वाटला नाही. त्यामुळे, त्यांची मांसाहारावर कधीही आसक्ति जडली नाही, हेही तितकेच खरे.

तोंडाला पक्षघाताचा झटका

तात्यासाहेबांचा व माझा आता घरोबा झाला होता, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांच्या खाजगी बैठकीत माझा समावेश होऊ लागला; व माझ्याविषयी त्यांना आपुलकी वाटू लागली होती. अशातच त्यांना अर्धांगवायूचा एकाएकी झटका येऊन त्यांचे तोंड वाकडे झाले; व डोळा बारीक झाला. त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. औषधी घेतल्या. नाना उपाय केले, पण त्या मानाने गुण कमीच. माझ्या वडिलांनाही असाच तोंडाला अर्धांगाचा आजार झाला होता. त्या वेळी माझ्या गावची (दिग्रस) बिसमिल्लाबी फकिरीण हिने लोण्यात औषधी मिसळून बरेच दिवस तोंडाची मालीश करून तोंड पूर्ववत सरळ केले होते. मी तात्यांजवळ त्या बाईची शिफारस केली; व तात्यांनी संमती देताच तिला मी बोलावून घेतले. ही बाई उंच, गोरी व फार देखणी होती. तिला गोषा नव्हता; व ती मराठी चांगले बोलत असे. तिने तात्यांच्या तोंडाला औषधी लावून, पंधरा सोळा दिवस परिश्रमपूर्वक मालिश करून, तात्यांचे तोंड पुष्कळच चांगले केले. त्यामुळे मलाही एक प्रकारचे समाधान लाभले. तात्यांनी तिचा सर्व खर्च देऊन, तिची योग्य संभावना करून, तिला वाटेस लावले.

भोळे तात्या

या आजारात तात्यासाहेबांची मन:स्थिती मात्र विचित्र झाली होती. इतके प्रयत्न करूनही जेव्हा यावा तसा गुण येईना, तेव्हा तात्या खिन्न होऊन निराश होत. त्यांना कोणी म्हटले की, "तात्या, आज तुमचा डोळा किंचित् बारीक दिसतो काय?" की लागलीच तात्यांनी अनेकांना तोच प्रश्न करावा. "तात्या, आज तुमचा डोळा अगदी पूर्ववत दिसतो बरं का!" असे कोणी म्हटले, की तात्यासाहेबांनी लागलीच म्हणावे, "दिसतोय खरा!" तात्यासाहेबांसारखा मनुष्यस्वभावाचा सच्चा पारखी, नाट्यसृष्टीत विविध स्वभावाची पात्रे निर्माण करणारा यशस्वी नाटककार दुसऱ्याने सहज म्हटले तेच खरे समजून तसे वर्णन करी, हे पाहून तात्यासाहेबांच्या भोळेपणाची जाणीव झाल्यावाचून रहात नसे.

त्यामुळे अनेक धूर्त व लबाड व्यक्तींनी व्यवहारातसुद्धा तात्यासाहेबांच्या या सरळ, भोळ्या व सौजन्यपूर्ण स्वभावाचा अवास्तव फायदा घेतल्याची उदाहरणे मला माहीत आहेत.

तात्यासाहेबांची स्मरणशक्ती

तात्यासाहेबांची स्मरणशक्ती आश्चर्यजनक होती. शंभर वस्तु एका वेळी लक्षात ठेवून पाहिजे त्या क्रमांकाची वस्तु बिनचूक सांगण्याचे काही खुले प्रयोगही त्यांनी कॉलेजमध्ये केले होते; व ते अत्यंत यशस्वी झाल्याचे मला माहीत आहे. त्याचे संपूर्ण तंत्र सांगण्याची ही वेळ नव्हे. असे काही प्रयोग नागपूरच्या सुप्रसिद्ध महिला (तात्यासाहेबांच्या पुतणी) सौ. विमलाबाई देशपांडे यांनीही यशस्वी रीतीने केल्याचे मी ऐकले आहे. सारांश हे अचाट स्मरणशक्तीचे व कल्पकतेचे काम आहे, यात शंका नाही.

क्लब जीवन

मी जळगावला असता तात्यासाहेब हे आमचे एक आश्रयस्थान झाले होते. त्या वेळचे जिल्हाधिकारी हे बहुतेक आय. सी. एस्. असावयाचे. ते अतिशय हुशार, धूर्त व चाणाक्ष असत. सायंकाळी ते क्लबमध्ये आले, म्हणजे त्यांच्याशी बोलण्याचालण्याकरता काही प्रतिष्ठित सज्जनांस बोलावणे आम्हास भाग पडे. अशा वेळी कोणत्याही राजकीय पक्षात सामील नसलेली माणसे मिळणे दुर्मिळ. अशा वेळी तात्यासाहेबांचा आम्हाला फार

उपयोग होई. आम्ही त्यांना आमंत्रण देत असू. मराठीतील श्रेष्ठ विनोदी नाटककार व थोर समाजसुधारक म्हणून त्यांची ओळख करून देताना आम्हाला व अधिकाऱ्यांनाही निर्भयता व मोकळेपणा वाटे. तात्यासाहेबांनी अशा प्रसंगी आपल्या अष्टपैलू विद्वत्तेची व विशेषतः विनोदी स्वभावाची छाप बसविलेली होती.

कै. गडकरी

तात्यासाहेबांच्या बोलण्यात कै. गडकरी यांचा मोठ्या जिव्हाळ्याने वारंवार उल्लेख येत असे. गडकऱ्यांच्या प्रतिभेविषयी तात्यांनी अनेक वेळा मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. पण, त्याबरोबरच त्यांनी निर्माण केलेल्या पात्रांची, कल्पनांची, फार काय पण पदांची गडकऱ्यांनी नक्कल केल्याचेही त्यांनी स्पष्टपणे सांगून टाकले होते. परंतु, कै. गडकरी हे लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झाल्यामुळे व तात्यांना ते उघड गुरू मानीत असल्यामुळे, त्यांना कोणत्याही रीतीने गौणपणा आणणे तात्यासारख्या गुरूला तरी शक्य नव्हते. त्याशिवाय, काळ मोठाच रत्नपारखी असल्यामुळे, तात्यांना केव्हा न केव्हा तरी सत्य उघडकीस येईल, याची खात्री वाटत होती; व तसा दृढ आत्मविश्वास वाटत होता, यात शंका नाही. यासंबंधी मी इ. स. १९२६ साली माझे मित्र व विद्वान् साहित्यिक प्रि. नानासाहेब पराडकर यांना लिहिलेल्या पत्रात चर्चा केलेली आहे. हे पत्र यवतमाळचे विदर्भ साहित्य संमेलनाच्या वेळचे आहे. म्हणजे त्या वेळेपासून गडकऱ्यांसंबंधी साहित्यिकांचा मतप्रवाह कोणत्या दिशेने वहात होता, हे स्पष्ट होईल. या थोर गुरुशिष्यांचे मराठी वाङ्मयात किती उच्च व अढळ स्थान आहे, हे आता सर्व विद्वानांना कळून चुकले आहे.

पाहुणचाराचे भाग्य

तात्यांच्या कुटुंबाचा व आमचा आता चांगलाच घरोबा वाढीस लागला होता. मी सहकुटुंब खामगावला तात्यांच्या घरी अगदी मोकळेपणाने जा ये करू लागलो होतो; व घरात सर्वांचा पूर्ण परिचय झालेला होता.

एकदा खामगावला तात्यांच्या घरी मुक्काम करण्याचा योग आला. त्यांच्याकडे उतरण्याचा तो माझा पहिला प्रसंग. तात्यांचा स्वभाव खरोखरच फार प्रेमळ. प्रत्येक लहान सहान गोष्टीची ते दक्षतेने विचारपूस करावयाचे. जेवणाच्या पदार्थापासून तो रात्रीच्या झोपेच्या व्यवस्थेपर्यंत पाहुण्यांचा कार्यक्रम त्यांनी स्वतः जातीने ठरवावयाचा. यामुळे तर माझ्यासारखा सामान्य माणूस त्यांच्या उपकारांच्या ओझ्याखाली दडपून जायचा. खाण्यापिण्याला तर वाण नव्हती. खरोखर तात्यासाहेबांचा पाहुणा होण्यासारखे दुसरे सुख नव्हते. या राजेशाही पाहुणचाराचा गैरफायदा घेणाऱ्या पाहुण्यांचे वर्णन त्यांनी आपल्या एका विनोदी लेखात करून ठेवले आहे.

झोप उडाली

त्या दिवशी रात्रीचे भोजन झाल्यानंतर गप्पागोष्टी झाल्या. मला माडीवर नेऊन झोपण्यास मोठा छप्पर पलंग दाखविण्यात आला. मी पलंगावर अंग टाकले मात्र,तोच माझ्या मनाची विचारचक्रे गरगरा फिरू लागली. वाटले, आपण केवढ्या थोर व्यक्तीच्या शयनगृहात झोपतो आहोत;—तात्यांच्या खास पलंगावर! एक ना दोन, असंख्य विचारांनी माझ्या मनात काहूर उठवून दिले. आगगाडीतील उतारूंप्रमाणे विचारांचा एकच गर्दी व जा ये सुरू झाली. काही केल्या स्वस्थता वाटेना व झोप येईना. एक वेळ वाटे की, आपण खाली झोपावे. पण, पुन्हा वाटे की, नोकराने बघितले तर? सर्व रात्र अशा विचारकल्लोळात निघून गेली. तोच कोंबड्यांनी बांग दिला. मी माडीवरून खाली उतरलो. तात्या उठलेलेच होते. त्यांनी विचारले, "काय नायबसाहेब झोप ठीक झाली ना?" डोळे चोळीतच मी म्हटले, "खूप छान!"

साहित्य आणि मानवी जीवन

—डॉ. द. भि. कुळकर्णी

वाङ्मयकलेसंबंधी चिंतन करणं हा वाङ्मयप्रेमी व्यक्तीचा आवडता छंद असतो; आणि या छंदाला अंत नसतो. जो जो चिंतन करावं तो तो नवनवीन प्रश्नोत्तरं सामोरी येतात; त्यांचं स्वागत करण्यात, त्यांचं हवं नको पाहण्यात मोठा आनंद असतो. जिवाभावाची माणसं भेटावी, त्यांच्याशी खूप बोलावं, त्यांनीही आपलं मन मोकळं करावं, कधी काही न बोलताच एकमेकांचं हितगुज जाणून घ्यावं. . . तसं हे वाङ्मयकलेसंबंधीचं चिंतन असतं.

या चिंतनाचं केंद्र अर्थातच 'साहित्य म्हणजे काय?' हा सनातन प्रश्न असतो. साहित्य म्हणजे काय?—तसं तर या प्रश्नाचं उत्तर फार साधं आहे : साहित्य म्हणजे शब्द. आणि 'शब्द वापुडे केवळ वारा.' परंतु 'शब्द, शब्द आणि शब्द' म्हणून एखाद्यानं ज्यांना खुशाल हिणवावं असे हे शब्द परिणाम केवढा साधतात! कधी ते डोळ्यात पाणी आणतात; कधी अर्ध्या हातावरची हाकही ऐकू येऊ नये इतके ते कान बधिर करून टाकतात; कधी देहावर रोमांच उठवितात. . . रमा–माधव कुठले कोण? पण त्यांच्या उत्कट सहजीवनानं आपलं अंतःकरण हेलावून जातं. रमा–माधव निदान इतिहासानं तरी पाहिलेले असतात. पण दादा फाटक आणि वृंदा आणि दिवगी हे कोण? ही तर या जगात कधीच जन्मास न आलेली माणसं—अगदी काल्पनिक. पण त्यांच्या जीवाची परवड पाहून आपण अगदी विद्ध होतो. आणि हे सारं कशाच्या बळावर? तर निव्वळ शब्दांच्या. साहित्यातले शब्द बघा असे मंतरलेले असतात. ते आपल्याला हसवतात, रडवतात, क्रुद्ध आणि विद्ध करतात. अर्थात ही शक्ती या शब्दांना जीवनानं बहाल केलेली असते. साहित्य शब्दरूप तर खरंच; पण साहित्यातील शब्द म्हणजे निव्वळ 'वारा' नसतो; त्यात जीवनाचा 'प्राणवायू' भरलेला असतो! हे शब्द जीवनाचे अनुगामी असतात. या जीवनामध्ये जे जे म्हणून काही असेल ना ते ते सारं या शब्दब्रह्मानं आत्मसात केलेलं असतं. या वाङ्मयकलेमध्ये काय नसतं? बबन आणि वहिनी यांची हळुवार प्रीती यात असते; 'अन्याय घडो कोठेही चिडून उठू आम्ही' अशी मानवता यात असते; आणि 'उद्याच्या त्या दिव्य आणि उष्ण प्रीतीसाठी आज सोडू द्वेषाचिये जळजळीत वाण' अशी क्रांतीची घोषणाही यात असते. जीवनात जे जे सुंदर, पवित्र, शाश्वत, सत्य ते ते सारंच साहित्यात असतं.

—पण एवढंच नसतं.

आपल्याला नको असंही या जीवनात फार असतं; इथं कुरूपता असते, वंचना असते; इथं क्षुद्रपणा, विद्वेष, दैन्य, दारिद्रय सारं काही असतं; इथं चांगलं आणि वाईट, भव्य आणि क्षुद्र एकमेकात गुरफटून गेलेलं असतं. आयुष्यात आपण हे टाळत असतो—आपण महारोगी, भिकारी टाळतो, आपण झोपडपट्टीची वाट चुकवितो, आपण बलात्काराच्या आणि आत्महत्त्येच्या बातम्या रोज वाचूनही विसरतो—पाप, अपराध आणि विकृती यांचं आपल्याला भय असतं, जुगुप्सा असते. ते सारं आपण विसरतो, डावलतो. पण म्हणूनच क्षणाक्षणाला जीवन जगत असूनही या जीवनाचं आपलं आकलन अर्धवटच असतं; हे जीवनाच्या अर्ध्या अंगाचं आकलनही यथार्थ नसतं. पाण्यात बुडणाऱ्या माणसाच्या अवतीभवती, वरखाली आणि अगदी नाकातोंडात देखील भरपूर पाणी असतं;

पण म्हणूनच पाण्याची चव आणि पाण्याचे गुणधर्म त्या बिचाऱ्याला काही समजत नाहीत. आपलीही स्थिती तशीच असते. या जीवनात आपण इतके 'बुडून' गेलो असतो की, या जीवनाची चव आणि त्याचे गुणधर्म जाणण्याची आपली शक्तीच आपण हरवून बसतो. बुडणाऱ्या माणसाला पाण्याच्या बाहेर काढावं तसं साहित्य प्रथम आपणास अवतीभवतीच्या, स्वतःच्या जीवनाच्या बाहेर काढतं. म्हणूनच तर ललितसाहित्य वाचीत असताना आपली समाधी लागते, आपण स्वतःला, अवतीभवतीच्या जगाला पार विसरून जातो. साहित्य आपल्याला असं आपल्या संकुचित जीवनकोषातून बाहेर काढतं अन् त्यातूनच समग्र-जीवनाच्या आकलनास आपणास पात्र करतं. मग मांगगारूडी बाबा, पती असतानाही विधवा झालेली राधा, बालमित्राच्या यशानं कडूजहर झालेला चौगुले, देहविक्रय करणाऱ्या केसर आणि मोरणी यांच्या शोकांतिका, यांचं दैन्य, यांच्या विकृती आणि यांची पापं आपण जवळून पाहू शकतो, हे जीवनाचं काळंबेरं अंगही साहित्य वेचून घेतं. त्याला आस्वाद्यमान करतं. जीवनातील सारं बरंवाईट साहित्यात प्रतिबिंबित होतं अन् म्हणूनच साहित्याला 'जीवनाची प्रतिकृती' म्हणतात.

पण साहित्य जीवनाची निव्वळ 'प्रतिकृती'ही नसते; ती जीवनाची पुनर्निर्मिती असते. जीवन सोनं असेल तर साहित्य हा त्या सोन्याचा दागिना असतो! साहित्याच्या रूपानं हे जीवन पुनर्जन्म घेत असतं! आणि साहित्याचा हा पुनर्जन्म सौंदर्ययोनीत असतो. जीवनातील सारं सत्य आणि असत्य, शिव आणि अशिव, शाश्वत आणि अशाश्वत, सुंदर आणि असुंदर साहित्यात प्रतिबिंबित होतं; त्यांचं ते मूळ रूप कायम राहतं आणि तरीही त्यांना सौंदर्याचं वरदान लाभलेलं असतं. हा एक चमत्कार आहे पण तो सत्य आहे. जीवनातील यश, कीर्ती, वैभव, सौंदर्य, धर्म आणि जीवनातील अपयश, अपकीर्ती, दारिद्र्य, कुरूपता, अधर्म या साऱ्यांचं साक्षात अवतरण साहित्यात होत असतं. या घटकांकडे आपण सुटेपणानं पाहिलं तर अर्थातच त्यापासून सुख-दुःख, अभिमान-तिरस्कार, आवड-नावड असेच भाव आपल्या मनात निर्माण होतील; पण त्यांच्याकडं असं सुटेपणानं पाह्यचं नसतं. कारण साहित्यकृतीत त्यांचा 'संयोग' झालेला असतो; त्यांची एक संघटना झालेली असते. या संयोगातूनच रसनिष्पत्ती होते; या संघटनेतूनच सौंदर्य साकार होतं. या रसाचा, सौंदर्याचा प्रत्यय हा खरोखरच अलौकिक प्रत्यय असतो. साहित्य जीवनानुगामी असतं; पण जीवनाच्या तुलनेनं कुठऱ्याही अर्थानं दुय्यम नसतं. 'जीवन+सौंदर्य=साहित्य' असं जीवन आणि साहित्य यांचं समीकरण असतं. म्हणूनच महाभारत आणि रामायण ही महाकाव्यं मानवी जीवनाहूनही महान ठरतात! "म्हणौनि भारती नाही। ते न्हवे चि लोकी तिही। एणे कारणे म्हणिपे पाही। व्यासोच्छिष्ट जगत्रय॥" आणि "काव्य अगोदर झाले, नंतर झाले जग सुंदर। रामायण आधी, मग झाला राम जानकीवर" असं म्हणतात ते उगीच नाही!

महाभारत आणि रामायण! या दोन साहित्य-ग्रंथांनी मानवी जीवनमूल्यांची जी जोपासना केली तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. इलीअड आणि ओडोसी ही देखील अशीच प्राचीन महाकाव्ये आहेत. परंतु ती मृत संस्कृतीची प्रतीकं आहेत. महाभारत आणि रामायण ही तितकीच प्राचीन परंतु जिवंत संस्कृतीची प्रतीकं होत. इ. स. पूर्व कित्येक शतकांपासून आजतागायत ही तेजस्वी महाकाव्यं आपल्या समाजाला सर्व परिस्थितीत साथ करीत आहेत; महाभारत म्हणजे मुळातील 'जय' नावाचा संक्षिप्त ग्रंथ. ती पांडवांची जयगाथा. त्या जयगाथेला वैशंपायन मुनीनं 'भारत' असं नाव देऊन त्याचा विकास केला. आणि पुढं सौतीनं या भारतालाच एक लाख श्लोकांचे 'महाभारत' केलं. अनेक शतकांमधून या महाकाव्याची निर्मिती होत होती. त्या त्या काळातील सर्व ज्ञान-विज्ञान, विद्या-कला, इतिहास-आख्यानं आत्मसात करून या महाकाव्यानं आपल्या समाजाला एक मूल्यवान सांस्कृतिक संचित बहाल केलं; या महाकाव्यानं एका दीर्घायुष्यी आणि विकसनशील संस्कृतीला शब्दबद्ध केलं.

आपल्या संस्कृतीची आणि साहित्यकलेची एक मर्यादाही महाभारतानं ओलांडली. प्राचीन संस्कृतात काय आणि मराठीत काय अस्सल आणि विदग्ध शोकान्तिकांचा अभावच आहे. त्याचं कारण बहुधा 'कर्मविपाका'चा आपल्या मनावरील पगडा हेच असावं. चांगल्या कर्माची चांगली फळं नि वाईट कर्माची वाईट फळं माणसाला मिळणारच अशी भारतीय मनाची धारणा असते. अशा समाजधारणेतून शोकात्म साहित्य कसं निर्माण व्हावं? कारण शोकात्म साहित्यात तर सज्जनावर आपत्ती आणि दुर्जनाचा विजय असं जीवनचित्र असतं!—कर्मविपाकाच्या सिद्धांताला तिथं निश्चयानं हरताळ फासला जातो. म्हणूनच प्राचीन भारतात एखादा सोफोक्लीज किंवा शेक्सपियर आढळत नाही.

पण 'महाभारत' या साऱ्याला अपवाद आहे; महाभारतातील शोकात्म जीवनदर्शन अनन्य आहे. कर्ण आणि अश्वत्थामा यांची जीवनचित्रे रेखाटून महाभारतानं कर्मविपाकाच्या पलीकडं असलेली व्यक्तिजीवनाची स्वतंत्रता आणि शोकात्मता यांचं भेदक चित्रण केलं आहे. कौरव आणि पांडव यांच्यातील दुर्दम्य संघर्ष आणि वेगवेगळ्या अर्थानं झालेली त्यांच्या जीवनाची शोकात्मिका देखील या दृष्टीनं लक्षणीय आहे.

'महाभारत' हा वटवृक्ष असेल तर 'रामायण' हा अश्वत्थ वृक्ष आहे. महाभारतानं मानवी जीवनाचं पराकोटीचं वास्तव आणि निर्वृत चित्र आपल्यापुढं उभं केलं—हे जीवन मूळ कसं धरतं, त्याला पारंब्या कशा फुटतात, त्यांचा विस्तार कसा होतो, हे महाभारतानं दाखविलं तर 'भर उन्हाळ्यातही हिरव्या पानांनी लकलकणाऱ्या' पिंपळ-वृक्षाप्रमाणं हा जीवनवृक्षही सत् अंशाची कशी राखण करीत असतो ते रामायणानं सांगितलं. मुळात रामायण ही रामाच्या अयनाची, प्रवासाची कथा; रामाची जयगाथा. परंतु विविध धर्मपंथांनी या वीरकथेला शांतकरुण रसांची जोड दिली; कुशीलव, चवनभार्गव आणि वाल्मीकि यांनी त्यातून तीन महापुरुषांची आदर्श-चित्रे साकार केली; राम, हनुमंत आणि रावण. अयोध्येत रामकथा, किष्किंधानगरीत हनुमंतकथा आणि लंकापुरीत रावणकथा प्रचलित होती. या तीन कथांमध्ये एक निश्चित नीतिसूत्र ओवून रामयणकारांनी आदर्श राजा-राम, आदर्श सेवक-हनुमंत आणि आदर्श विरोधक-रावण अशी पात्रे उभी केली. लक्ष्मण आणि बिभीषण, सीता आणि उर्मिला इत्यादी पात्रांच्या रूपाने अनुक्रमे आदर्श बंधू आणि आदर्श भार्या यांची विभिन्न परंतु परस्परपोषक चित्रेही सूचित केली. महाभारताच्या बरोबरीनंच रामायणानंही भारतातील जीवन अंतर्बाह्य घडविलं; त्यातील उत्तमाचं संरक्षण केलं. एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा' पासून ग. दि. मां. च्या 'गीत रामायणा' पर्यंत रामायणानं किती मराठी रूपं घेतली, त्यातून कोणती जीवनप्रयोजनं आणि साहित्यप्रयोजनं साधली हे सांगायचं म्हटलं तर एक 'नवीन रामायण'च होईल! एवढं वरीक थोडक्यात सांगता येईल की आपल्या समाजाची त्या त्या काळाची सांस्कृतिक आणि साहित्यिक गरज रामकथेनं अचूक भागविली. ही रामकथा कधी वीरकथा झाली आणि राष्ट्रगाथा झाली; कधी ती धर्मकथा झाली आणि नीतिकथा झाली; आणि कधी तिनं कुटुंबकथा आणि प्रीतिकथा यांचंही रूप घेतलं! प्रसन्न असा **राम**प्रहर असो वैऱ्यावर हाणावयाचा **राम**टोला असो, मनःपूर्वक केलेला वा बळजोरीचा **रामराम** असो अथवा अगदी **राम** म्हणायचा प्रसंग येवो. . दैनंदिन व्यवहारातील हरेक लहानमोठ्या क्षणी या रामायणानंच आपली पापपुण्याची, यशापयशाची, सुखदुःखाची जाणीव घडविली.

साहित्यानं—आणि आणखी कुणीही—यापेक्षा अधिक काय करावं?

महाभारत-युद्धकालीन तिथ्या व नक्षत्रे

प्रा. ग. वा. कवीश्वर, इंदूर

(लेखांक २ रा)

आता डॉ. नानासाहेव मिराशी यांनी सन १९२१ च्या 'विविधज्ञानविस्तारां'तील ज्या दोन लेखांकडे माझे लक्ष वेधले त्यांचा विचार करितो. प्रथम श्री. रामचन्द्र गोखले यांचा "भारतीय युद्ध एक दिवसाआड होत होते" हा लेख प्रकाशित झाला. व नंतर डॉ. के. ल. दप्तरी यांनी त्याचे खंडन करून "भारतीय युद्ध एक दिवसाआड होत नव्हते" हा लेख लिहिला. यावरून भारतीय युद्ध एक दिवसाआड होण्याची व मधल्या अवकाश दिवसात रणभूमी साफ केली जाण्याची कल्पना त्यावेळी व्यक्त झाली होती हे खरे. मात्र डॉ. दप्तरी यांच्या खंडनानंतर श्री. गोखले यांनी तिचा पाठपुरावा केल्याचे दिसत नाही. डॉ. दप्तरी यांनीही नंतर आपल्या पुस्तकात तिचा उल्लेख केलेला दिसत नाही. इतकेच नव्हे तर डॉ. काणे, डॉ. वेलवलकर व भांडारकर संस्थेचे संपादक आदी इतरांनीही तिचा उहापोह किंवा उल्लेखही केल्याचे आढळून येत नाही. वहुधा सर्वांनाच ती कल्पना अत्यंत उपेक्षणीय व असंभाव्य वाटली असे दिसते.

याचे एक प्रमुख कारण असे असावे की, स्वतः श्री. गोखले यांच्या लेखात ती कल्पना फार चमत्कारिक स्वरूपात व्यक्त झाली आहे. त्यांचे प्रतिपादन असे आहे की, महाभारत युद्ध प्रत्यक्ष घटना म्हणून तत्कालीन प्राचीन युद्धरीतीप्रमाणे एक दिवसाआड झाले असले पाहिजे, पण नंतर लिहिलेल्या महाभारत काव्याच्या विभिन्न लेखकांपैकी अनेकांना त्याची जाणीव नसल्याने महाभारतात त्या घटनेशी विसंगत असे अनेक श्लोक लिहिले गेले आहेत. श्री. गोखले अमावस्येला युद्धारंभ मानून एक दिवसाआड युद्ध मोजत, चौदाव्या दिवशीचा उत्तर रात्रीचा चन्द्रोदय सिद्ध करू पाहतात; पण त्यानंतर युद्धाचे शेवटचे चार दिवस मात्र (काहीही विशेष कारण न देता) ते लागोपाठ दररोज लढाई मानतात! त्याशिवाय त्यांना गदायुद्धाचे श्रवण नक्षत्र जमणार नाही! शिवाय दुसरी चमत्कारिक गोष्ट म्हणजे भीष्मपतन व भीष्मनिधन यांच्या तिथ्या श्री. गोखले युद्ध रोज चालले याच आधारावर मोजतात! म्हणजे चौदाव्या दिवशीच्या चन्द्रोदयासाठी युद्ध एक दिवसाआड मानावयाचे; पण त्याच वेळी दहाव्या दिवशींच्या भीष्मपतनासाठी मात्र ते दररोज मानावयाचे, असला विलक्षण व विसंगत प्रकार त्यांनी केला! साहजिकच डॉ. दप्तरी यांनी एक दिवसाआड कल्पनेची विशेषता मान्य करूनही श्री. गोखले यांची कालगणना नाकारली; व ती गोष्ट तेथेच राहिली, आणि डॉ. दप्तरी युद्ध दररोज चालले याच आपल्या कल्पनेस चिकटून राहिले. त्यांनी एक दिवसाआड युद्धाच्या कल्पनेकडे केवळ श्री. गोखले यांच्या लेखाच्या दृष्टिकोनातून पाहिले असे दिसते. श्री. गोखले यांच्या कालगणनेने वलरामाच्या यात्रेचे एकूण वेचाळीस दिवसही बरोबर जमत नाहीत. ते चौदाव्या युद्धदिवसानंतरही अवकाश मानतात व युद्धाचे एकूण वत्तीस दिवस मोजतात. यात युद्धारंभापूर्वीचे सात दिवस मिळवून बलरामाच्या यात्रेचे ३९ दिवसच होतात. शिवाय गदायुद्ध शल्यवधाच्या दुसऱ्या दिवशी झाले याची, आणि तसेच भीष्मनिधन तिथीच्या "त्रिभागशेष" पौर्णिमेच्या रहस्याचीही श्री. गोखले

किंवा डॉ. दप्तरींना कल्पना नव्हती. आणि त्या दोघांचे (इतर कित्येकांप्रमाणे) युद्धारंभ दिनाचे नक्षत्र ज्येष्ठा होते; पण माझ्या सिद्धांताप्रमाणे ते चित्रा आहे. या सर्व कारणामुळे श्री. गोखले यांचे डॉ. दप्तरींनी जे खंडन केले त्याचा माझ्या प्रस्तुत संशोधनावर प्रभाव पडत नाही हे सहज कळून येईल.

श्री. गोखले यांच्या लेखनानंतर इतर काहींनी तर त्यांच्या कल्पनेचे अगदीच विडंबन केले असे डॉ. दप्तरींच्या लेखावरून दिसते. आपल्या मतानुसार तिथ्या जमविण्यासाठी भीष्म कधी एक दिवसाआड तर कधी दोन दिवसांआड युद्ध करीत असेही म्हटले गेले !

सारांश, श्री. गोखले यांच्या मनात एक दिवसाआड युद्धाची कल्पना चमकून गेली; व तेवढयापुरते त्यांना श्रेय देणे उचितच आहे. पण ती कल्पना प्राचीन भारतीय युद्ध परंपरेच्या त्यांनी वाचलेल्या माहितीवर आधारलेली होती (हे त्यांनी कोठे वाचले हे स्पष्ट नाही) ; खुद्द महाभारतातील कूटस्थलांच्या स्पष्टीकरणावर नव्हे, व म्हणूनच ती इतक्या विसंगत व अपूर्ण स्वरूपात व्यक्त झाली व विराम पावली. माझ्या मताने प्रत्यक्षात असे एक दिवसाआड युद्ध खरोखरच झाले असेल किंवा नाही हे आज तरी निश्चित सांगता येत नाही; पण महाभारत काव्याच्या महान रचयित्याने मात्र याच मूलभूत रहस्यमय कल्पनेच्या आधारावर युद्धारंभतिथी पासून भीष्मनिधन तिथीपावेतो अनेक गूढ कूटस्थळे आपल्या अपूर्व प्रतिभाकौशल्याने निर्माण करून ठेविली आहेत. या मूलभूत कल्पनेशी विसंगत अशी अनेक स्थळं महाभारतात आहेत असे श्री. गोखले यांना वाटते ते बरोबर नसून, या आपाततः विसंगत दिसणाऱ्या श्लोकांच्या मुळाशी कूटरूपाने तेच रहस्य आहे. व हेच मी प्रत्यक्ष महाभारतातील श्लोकांच्या सूक्ष्म विश्लेषणाने सिद्ध करीत आहे. या स्पष्टीकरणामुळे महाभारत युद्धाचे वर्ष, महाभारत काव्याचा कर्ता, लेखनकाळ इत्यादी प्रश्नांवरही महत्त्वपूर्ण प्रकाश पडत आहे.

शेवटी, सदर श्री. रामचन्द्र लक्ष्मण गोखले यांनी या विषयावर आणखीही काही लेखन केले होते काय याची अधिक माहिती जाहीर किंवा खाजगीरित्या कोणी दिल्यास मी आभारी होईन.

जीवनाचा मूळ गंध

लेखक :
कै. जनार्दन श्रीकृष्ण देशपांडे

"जीवनाचा मूळ गंध
हुंगता मी झालों धुंद !"

मी फुलांचा सुगंध हुंगत नाही, देवाचाच हुंगतो. फळांचा रस चाखत नाही, देवाचाच आस्वाद चाखतो. सृष्टीचे विविध रंग डोळ्यांना दिसत नाहीत, ते प्रत्यक्ष देवाचेच रंग असतात. चहाची चव घेऊन तृप्त होत नाही, प्रत्यक्ष देवालाच चाखत असतो. ऊस चोखत नाही, प्रत्यक्ष देवाचीच गोडी चोखतो. प्राणीमात्रावर, माणूसमात्रावर प्रेम करीत नाही, प्रत्यक्ष देवावरच प्रेम करतो. अनंत रूपात अनंत वाटांनी देव मला अहोरात्र भेटत आहे. सांसारिक सुखं ही देव भेटल्याचीच सुखं मला देत असतात. परमार्थ आणि संसार यांच्यातील भेदच मावळला आहे. आता देव अमूक स्वरूपातच भेटला पाहिजे असा माझा आग्रह नाही. कोणत्या रूपात भेटायचं ते सर्वस्वी त्याच्यावरच मी सोपवून दिलं आहे. दत्तात्रय देवता भेटणं आणि दत्तात्रय नावाचा माणूस भेटणं ही जवळ जवळ मला सारखीच वाटतात. दत्तात्रयात काही दैवी सामर्थ्ये एकवटली असतील ती दत्तात्रय या माणसात सापडणार नाहीत पण देव दत्तात्रयाची लहर माणूस दत्तात्रय म्हणून वावरावयास लागली आहे. एवढं ठाम समजल्यावर दैवी शक्ती असणं किंवा नसणं यांच्यातील भेदच मावळतो. साधी माणसं देवस्वरूप वाटायला लागणं हे अध्यात्मातलं परमोच्च रहस्य आहे. ते साधलं त्याला सर्व साधलं.

माणूस आणि देव असा भेद जोपर्यंत दृष्टीला दिसतो तोपर्यंत त्या दृष्टीला फक्त देवातला देवच ओळखता येतो. माणसातला संपूर्ण देव ओळखता येत नाही एवढंच म्हणता येईल. ती दृष्टी कोणती ? ती फार झालं तर योगदृष्टी म्हणता येईल. ज्ञानदृष्टी म्हणता येणार नाही. ज्ञानदृष्टीशिवाय नुसत्या योगदृष्टीला परमेश्वराची फक्त दैवी बाजू दिसेल पण त्याची दुसरी बाजू दिसणार नाही. मी लहानपणापासूनच ज्ञानदृष्टीचा एकनिष्ठ उपासक असल्यामुळे मला नुसत्या योगदृष्टीचं एवढं कौतुक नाही. योगमार्गाचं आकर्षण नसताना सुद्धा देवदेवतांनी मला आंतरिक दर्शनं दिली याचं कोडं मला अजून उलगडलं नाही. पण देवदेवतांच्या दैवी गुणांपेक्षा मला माणसाच्या दैवीगुणांचंच वेड आहे. दैवी गुणसंपन्न देवापेक्षा दैवीगुणसंपन्न माणसातून मला देवाचा अधिक साक्षात्कार होतो. देव दैवीगुणसंपन्न असला तर त्याचं कौतुक ते काय करायचं ? पण अशा माणसाचं कौतुक करावसं वाटतं आणि अशा माणसांना उत्पन्न करणाऱ्या देवाचं त्याच्याहून अधिक कौतुक वाटतं. मला कोणतीही गोष्ट achieve करण्याचं वेड नाही. achieve करण्यासारख्याच गोष्टीकडे नुसतं कौतुकानं पहात बसण्याचं वेड आहे. माझा परमार्थ तिऱ्हाईतपणे देवांना आणि माणसांना आणि प्राणीमात्रांना आणि वस्तुजाताला पहात बसण्यात आहे. मी देवाचा उपासक नाही. त्याच्या सर्वांगीण अद्‌भुतपणाचा उपासक आहे. ते देवाचं अद्‌भुत संपादनीय नसल्यामुळे त्याकडे नुसतं पहात बसण्यात अद्‌भुत असं सुख आहे. त्या सुखाची उपासना या जन्मी मी अहोरात्र करीत आहे. आणखी किती जन्म मी हाच एकमेव धंदा करीत बसणार आहे कोण जाणे ! पण या अद्‌भुताकडे नुसतं पहातच बसण्यात माझे पंचकोश नित्यानंदानं भरभरून अहोरात्र वहात आहेत. तो आनंद लुटण्याकरिता मी जेव्हा एखादे वेळेस देवाला आमंत्रण देईन तेव्हाच त्याची माझी समोरासमोर भेट होईल !

पत्रव्यवहार

‘सुखद संभ्रम’ ही कविता केव्हा व कशी सुचली ?

श्री. संपादक ‘युगवाणी’ यांस स. न. वि. वि.–

युगवाणीच्या ‘एप्रिल १९६९’च्या अंकात ‘एका सन्माननीयाच्या एकाहत्तरी निमित्त’ या शीर्षकाखाली माझे परम मित्र श्री. प्रा. भ. श्री. पंडित यांचा माझ्या संबंधी लेख आला आहे. त्यात त्यांनी पृष्ठ ९३६ वरील शेवटच्या पॅरिग्राफात ‘कोणता मानू चंद्रमा’ हे गुणवंतरावांचे सर्वप्रसिद्ध सुरम्य शृंगारगीत एका रीतीकालीन कपोलकल्पित हिंदी कवितेवरून सुचले आहे की काय ते कळत नाही’ असा एक संशय प्रगट केला आहे. या मजकुरामुळे कवितेची मूळ कल्पना परभृत आहे की काय असा संशय वाचकांच्या मनात उत्पन्न होण्याची शक्यता आहे याकरिता सदर कवितालेखनाचा इतिहास लिहिणे भाग पडत आहे.

इ. स. १९२० साली मी नागपूर येथेच शिकत असताना त्याच वर्षी हिवाळ्यातील एका पौर्णिमेला आम्ही काहीजण रामटेक येथे गेलो होतो. संध्याकाळी श्रीराम दर्शनाकरिता गडावर गेलो. गडावर पूर्वेच्या बाजूला एक दरवाजा असून त्यावर गच्ची आहे व गच्चीच्या पूर्वभागाला एक झरोका आहे. वेळ संध्याकाळची असून पौर्णिमेच्या चंद्राचे आरक्त बिंब त्या झरोक्यातून पूर्वक्षितिजावर दृष्टीस पडताच माझ्या तोंडून ‘कोणता मानू चंद्रमा’ ही ओळ बाहेर पडली. ‘संधिकाल जव चुंबी एका’ या ओळीतील कल्पनाही त्याचवेळी मनात आली पण बरोबरीच्या लोकांबरोबर श्रीराम दर्शनाची घाई असल्यामुळे आम्ही मंदिरात गेलो. पुढील सर्व कार्यक्रमामुळे वरील ओळ व कल्पना तशीच मनात राहून गेली. पुढे प्रकृतीच्या अस्वाथ्यामुळे गावी जाऊन राहिलो. आमच्या गावी त्यावेळी पोस्ट नव्हते आणि लायब्ररी तर नव्हतीच नव्हती (अजूनही नाही). त्यामुळे तेथे हिंदी काव्य वाचावयास मिळण्याची अगदी ठार अशक्यता होती. नागपूरलाही त्यावेळी युनिव्हर्सिटी स्थापन झाली नव्हती व एकंदर त्यावेळच्या सुशिक्षित लोकांतही हिंदी वाङ्मय वाचण्याची प्रवृत्ती नव्हती. क्वचित् काही विरळा पंडित लोक तुलसीरामायण वाचत असतील तेवढेच. १९२० साली श्री. ज. के. उर्फ बुवा उपाध्ये, बोबडे, टेकाडे व मी यांनी एक नागपूरस्थ कविमंडळ स्थापन केले होते. त्याच संस्थेतर्फे नागपूरस्थ कवींचे संमेलन कोजागिरी पौर्णिमेस भरत असे. १९२१च्या कोजागिरी पौर्णिमेला भरणाऱ्या कविसंमेलनास मी यावे असे मला श्री. आनंदराव टेकाडे यांचे पत्र आले. आश्विन शु॥ चतुर्दशीला मी रात्री २ च्या गाडीकरिता धामणगाव स्टेशनवर गाडीवेळाने आलो. (त्यावेळी धामणगाव-यवतमाळ रोडवर आजच्यासारख्या बसेस किंवा केव्हाही मिळणाऱ्या लहान मोटारी नव्हत्या.) धामणगाव स्टेशनवर मला यवतमाळ येथील वकील श्री. अमृतराव साखळे भेटले. तेही नागपूरलाच जात होते. मी कविसंमेलनाकरिता नागपूरला जात आहे, असे कळताच त्यांनी काही नवीन कविता वगैरे केली आहे का असे विचारले. काही कौटुंबिक आपत्ती आल्याने त्यावेळी माझी मनःस्थिती स्थिर नसल्यामुळे मी काही नवीन लिहू शकलो नाही असे त्यांना सांगितले. व गाडी येताच आम्ही दोघेही एकाच डब्यात जवळजवळ बसलो. गाडीत गर्दी असल्यामुळे झोप मिळणे शक्यच नव्हते. गाडी धामणगाव स्टेशनवरून सुटल्यानंतर थोडयाच वेळात एक वर्षापूर्वी रामटेकला सुचलेल्या ओळीचे स्मरण होऊन ती सारखी मनात

घोळू लागली. श्री. साखळे वकील यांचे जवळून कागद पेन्सिल घेऊन 'कोणता मानू चंद्रमा' हे ध्रुवपद कागदावर लिहिले. एकामागून एक कडवी कागदावर उतरू लागली. त्यावेळी कडव्यांचा क्रम जसा कागदावर उतरला तसाच तो अक्षरशः अजून कायम आहे. एकाद्या कानामात्रेचाही फरक त्यात करावा लागला नाही. किंवा सफाईचा हात फिरवावा लागला नाही. कविता धामणगाव ते पुलगावचे दरम्यान पूर्ण झाली. कवितेला गाडीत नाव दिले नव्हते. नागपूरला सकाळी पोचल्यानंतर साधारण सकाळी ८ ते ९ च्या सुमारास श्री. बोवडे, टेकाडे, बुवा उपाध्ये व तात्याजी वझलवार यांची भेट झाली. संमेलनाकरिता नवीन कविता आणली की नाही असे वरील मंडळींनी विचारल्यावर मी कागद खिशातून काढून श्री. उपाध्ये यांच्या हाती दिला. कविता वाचून त्या सर्वांनीच समाधान व्यक्त केले. 'सुखद संभ्रम' हे नाव श्री. उपाध्ये यांनी कवितेला सुचविले.

कवि-संमेलनाची बैठक टाऊनहॉलमध्ये दुपारी सुरू झाली. श्री. कृष्णशास्त्री घुले अध्यक्ष होते. तिसरे प्रहरी ४ चे सुमारास श्री. शास्त्रीबुवांनी मला कविता म्हणण्यासाठी पाचारण केले. १९२१ च्या आक्टोबर मध्ये आश्विन शु।। पौर्णिमेच्या दिवशी 'सुखद संभ्रम' कविता प्रथम नागपूरच्या कविसंमेलनात म्हटली गेली.

'कोणता मानू चंद्रमा' या कवितेच्या रचनेचा इतिहास असा आहे. त्याकाळी व त्या वयात हिंदीचा मला गंधही नव्हता व हिंदी वाचावयास मिळणेही दुरापास्त होते. त्यावेळी माझे वाचन प्राचीन मराठी काव्य व काही संस्कृत काव्ये इतकेच सीमित होते. १९२१ च्या डिसेंबर मध्ये बडोदा येथील संमेलनात हीच कविता म्हटल्यानंतर काही दिवसांनी श्री. डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन यांनीही या कवितेची कल्पना एका पर्शियन कवितेवरून घेतल्याचा आरोप केला होता. परंतु जेथे हिंदीच कळत नव्हते व वाचावयास मिळत नव्हते तेथे पर्शियन काव्याची ओळख असणे ही गोष्ट वंध्यासुताइतकीच अशक्य कोटीतली होती. त्यामुळे श्री. पटवर्धनांचा आक्षेपही टिकू शकला नाही.

अनेक भाषांच्या वाङ्मयात सारख्या सारख्या कल्पना आढळतात. मानवांच्या भाव-भावना, प्रकृती धर्म सर्वसाधारणपणे सारखेच असल्यामुळे कोणत्याही काळातील मानवाला सारख्या कल्पना सुचणे शक्य असते. हे जर लक्षात घेतले तर 'अमकी कल्पना अमक्यावरून सुचली' अशी शंका सहसा कोणी काढू धजणार नाही. व काढली तर जपूनच काढील. उपरोल्लेखित लेखात श्री. पंडित यांनी ठामपणे विधान केले नसले तरी 'गुरुजींना डोरल्याची बाधा असावी' असा संशय शिष्याच्या मनात शिरला म्हणजे गुरुजींकडे पहाण्याची शिष्यांची दृष्टी जशी सदोष व साशंक होते तसाच प्रकार होण्याचा संभव असल्यामुळे वरील खुलासा करावा लागला.

श्री. पंडित यांनी लेख चांगला लिहिला व मला तो आवडला. मी त्यांचा आभारी आहे. •

—गुणवंत हणमंत देशपांडे

रेव्हरंड टिळक यांच्या पन्नासाव्या स्मृतीनिमित्त—

रेव्हरंड टिळक – कवी आणि काव्य

—प्रा. भ. श्री. पंडित

टिळकांना फुलामुलांचे कवी म्हणतात. याचे कारण त्यांनी या दोन विषयांवर विपुल कविता लिहिली आहे. ते फूल, मूल, तारे, पक्षी, कविता आणि मणी या कुणांतही फरक करीत नाहीत;–

'नक्षत्रे, सुमने, विहंगम, मुले, काव्ये, मणी ! ही जरी–
नावे भिन्न, खरोखरी मज फुले ही रम्य सारी तरी'

त्यांची वृत्ती भेदापलीकडे गेली होती, फुलाला ते फूल मानत नसून प्रेमलता, सात्विकता आणि पवित्रता यांचे प्रतीक मानत;–

'फुला ! तुझ्यासम काव्यस्फूर्ती कविंना देई न कोणी
न मी गायिली इतरां कवणा जितकी फुलांस गाणी
प्रेमल, सात्त्विक, पवित्र जितुके त्यांचे सूचक फूल !
मधुर ! मधुरतर ! असे न कोठे फुलावाचुनी शील !
अत्युक्तीही नाही नाही ! खरेच तुजला कथितो
इकडे वघतो फुले पुढे मी ! तिकडे काव्ये गातो !'

टिळकांनी फुलामुलांवर पुष्कळ लिहिले असले, तरी मर्मज्ञांना आणि रसज्ञांना त्यांची ओळख 'तत्त्वज्ञ कवि' म्हणून आहे.

टिळकांच्या आयुष्याची तिशी चाळिशी प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्यात गेली होती. पोटापाण्याची त्यांना चिंता असली, तरी तिला ते जुमानीत नव्हते. त्यांचे मन अशांत व अस्वस्थ होते. ते शांत कसे होईल याचे ते सतत चिंतन करीत होते. शेवटी बाप्तिस्मा घेतल्यावर ख्रिस्तदेवांच्या अनुसरणात व अनुकरणात त्यांना शांती व समाधान यांचा लाभ झाला.

टिळकांच्या कवितेमागे श्रद्धा, दया, क्षमा, शांती, प्रीती इत्यादी मानवी मनामधील मूलभूत प्रेरणा आहेत. भावनेत आणि प्रेरणेत किंचित अंतर आहे. भावनेचा आवेग अल्पकालीन असतो, एखाद्या निमित्ताने तो उसळतो. पण हळूहळू ओसरत जातो. प्रेरणा ही मनुष्याच्या मनात खोल रुजलेली असते. तिला जागृत होण्यास कारण लागत नाही. ती सदैव आपल्या ठिकाणी तत्पर असते. भावनेचा उथळ खळाळ तिच्यात नाही. ती गंभीर आणि सखोल असते. टिळक लहानपणापासून धर्मजिज्ञासु होते, निरनिराळ्या धर्ममतांचा अभ्यास करण्यात त्यांना गोडी होती. त्यात बायबलचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. ख्रिस्तमताचा स्वीकार केल्यावर काही काळाने त्यांना 'रेव्हरंड' पद प्राप्त झाले. त्यामुळे त्या मताचा नित्य अभ्यास करण्याची संधी त्यांना आपोआप मिळाली. धर्माशी नित्य संबंध आल्यामुळे साहजिक त्यांच्या ठिकाणच्या प्रेरणा बळकट झाल्या आणि त्यातून त्यांची कविता उगम पावली.

टिळकांच्या जीवनात 'प्रीती'ला विशेष स्थान आहे. तिच्यावर लतिकेचे रूपक करून अनेक कवितांत त्यांनी तिची महती गायिली आहे. टिळकांनी धर्मोपदेशकाचा पेशा पत्करला, पण ते कठोर व कर्मठ बनले नाहीत. प्रीतीच्या व्यापक व अक्षय्य स्वरूपाची ओळख त्यांना पटली. त्यांनी निवृत्तिमार्गाचे पवाडे गायिले नाहीत. ईश्वराची प्राप्ती व्हावी म्हणून 'वनवासी' बनले. त्या फुलास त्यांनी मोठ्या प्रेमाने समजाविले.

'तुला सांगतो, प्रिया प्रसूना म्हणशी तूं जी भक्ती,'
भक्ति न ती रे ! परि परमेशीं स्वार्थास्तव आसक्ती !

जगदीशाच्या निंदुनि कृतिला स्तोत्रे त्याला गावी
निर्दय होउनि त्या सदयाची पदवी जवळ करावी !
कोण म्हणे ही भक्ती ? किंवा उपासना ही कसली !
जगच्चालका कशी आवडे मती जगावर रुसली ?

प्रवृत्ती आणि निवृत्ती यांची झुंज अनंतकाळापासून चालू आहे तरी प्रवृत्ती टिकून आहे. संसारात सार आहे. त्यात राहून जनसेवा साधण्यात पुरुषार्थ आहे. जनात रहा की वनात रहा. क्षुधा, तृष्णा, थंडी, ऊन, सुख आणि दुःख या उपाधी कोणाला चुकल्या नाहीत. संसाराची थोरवी कळावी म्हणून ते त्याला म्हणाले;

'अनुरागाचा सुंदर तरुवर दुःखकर्दमी रुजतो !
अश्रुजलाच्या सारणिमाजी फोफावत तो जातो !
परि तो कर्दम, किंवा जल ते, आणी पुष्पफले ती
तया तरूची कोठें हरिती कल्पतरूची महती ?
वनभूमीवर जगे न तरु हा जनभूमीवर जगतो.
विभूतिने निज संसाराला सार जगाचे करतो.'

संसार प्रेममय आहे. प्रेम म्हणजेच जीवन. प्रेमहीन जीवन म्हणजे स्वार्थाचा अतिरेक आहे. ते मूर्तिमंत मरण आहे. प्रेमासाठी स्वतःचे सुख विसरून जाणे हीच खरोखर सुखाची पूर्ती आहे, त्यात देहविसर्जन होणे हीच मुक्ती आहे, त्यातच परमेश्वरप्राप्ती आहे, तोच स्वर्ग आहे. देवाजवळ राहावे असे वाटत असेल तर आपण प्रेमरूप होऊ आणि त्याच्याजवळ राहू—

'प्रेमनाम जगदीश फुला रे ! काय आणखी सांगू ?'

'प्रेम' या व्यापक शब्दाने टिळकांनी गृहस्थाश्रमाची वाखाणणी केली आहे. संसाराची परंपरा गृहस्थाश्रमामुळे अबाधित आहे. टिळकांचा हा विचार सेम्युएल डेनियल याच्या 'लव्ह'शी मिळता जुळता आहे; –

'Love is a sickness full of woes,
All remedies refusing,
A plant that most with
cutting grows
Most barren with best using
why so ?
More we enjoy it, more it dies,
If not enjoyed, it sighing cries,
heigh-ho !

टिळकांनी ख्रिस्ती मताची दीक्षा घेतली, तरी काही काळ लक्ष्मीबाई व देवदत्त स्वधर्मातच होते. त्या मधल्या वियोगकाळात टिळकांना हे प्रापंचिक तत्त्वज्ञान स्फुरले असावे. 'माझी भार्या', 'महारथी', 'कुणास्तव कुणी तरी', 'मी तुमच्या दारी भिकारीण म्हणणारीस' इत्यादी कवितांतून टिळकांचे पत्निप्रेम व्यक्त झाले आहे. लक्ष्मीबाईंनी आपल्याकडे यावे याची ते आतुरतेने वाट पाहात होते. एकदा एकाने त्यांना दुसरा संबंध करण्याविषयी सुचविले. तेव्हा त्या एकनिष्ठ, दीन, प्रेमळ, विरहव्याकुल पतीने उत्तर दिले—

तान्यांची माला नको मज त्या त्या सुमनाला ॥ध्रु०॥
रत्नपारखी हसोत नलगे हिरा, लाल, मोती । मला हो ।
कल्पलतेचे फूल नको मज आले जरि हाती । मला हो ।
चंपक, जाई, जुई, केवडा केवळ हो माती । मला हो ।
तया फुलास्तव देइन जीवाला ॥ १ ॥

लक्ष्मीबाईंनी टिळकांबरोबर सुखासमाधानाने संसार करून त्यांच्या पश्चात् अपुरे राहिलेले 'ख्रिस्तायन' पूर्ण केले; आणि 'स्मृति-चित्रा'च्या चार भागांची मराठी वाङमयात अभूतपूर्व भर घालून टिळकांना व स्वतःला अजरामर केले.

टिळकांनी संसारात श्रमाला फार महत्त्व दिले आहे. संसार, तत्संबंधी चिंता आणि परिश्रम हे सारे आनंदजनक व उत्साहदायक आहेत असे त्यांचे म्हणणे होते, आनंद आणि स्फूर्ति यांचे स्थान मनुष्याच्या मनातच आहे, प्रवृत्तीतच त्यांचा खरा विकास होतो. श्रमाचे सौंदर्य ते प्रकट करतात; –

'कुऱ्हाडिचे मम बघ रे पाते
रत्नकेतकीवर्णच नुसते !
नागासम हे मज डुलवीते !
अहा ! देवाची । मजवरी दया ही पुरती ।
देहतरू हा माझा फुलला
घर्मबिंदुंनी म्हणशिल ओला—
म्हण; परि सुमनांचा हा मेळा
मला दे शोभा । ती अभिनव अवघ्या जगतीं ।'

ससारात पतिपत्नीचा सहवास आणि श्रमसंस्कार याबरोबर त्याच्या सातत्यासाठी अपत्यांची जबाबदारी असते. टिळकांनी 'केवढे हे क्रौर्य!' या एकाच करुण कवितेत अपत्यांसंबंधीच्या जबाबदारीबरोबर अहिंसेची श्रेष्ठता, मानवतेची उदारता आणि ईश्वराची करुणा या तीन महान शक्तींचे गौरव केले आहे. पक्षिणीच्या परांत बाण रुतला. तिच्या अंगातून घळघळा रक्त वाहू लागले. ज्यांना रिझविण्यात वय गेले, त्या मनुष्याच्या दयेची, न्यायाची, औदार्याची आणि शूरत्वाची तिने व्याजस्तुती केली. मनुष्य किती कृतघ्न आहे याचा त्या निरपराध आणि दुबळ्या पाखराला अनुभव आला! ती आसन्नमरण पक्षिणी पिलांना म्हणाली; —

'म्हणाल भुलली जगा, विसरली प्रियां लेकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातले मी घरा,
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा'

पक्षिणीला वाटले की मी घरी गेले नाही, तर पिलांना वाटेल, की आई जगाच्या मोहात सापडली. आपले आता कुणी नाही. आपल्यावरले तिचे प्रेम संपले. ती आपणास टाकून गेली. यासाठी कर्तव्य म्हणून ती कशीवशी परत आली. आणि ईश्वराचे स्मरण करीत 'प्रभुपिता अनाथा सदा' अशी श्रद्धा प्रकट करून निधन पावली. टिळकांच्या कवितेमध्ये निव्वळ भावना नाही, प्रेरणा आहे, असे मी म्हणतो ते यासाठी. त्यांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास होता. त्यांच्या हृदयाचा विकास झाला होता. आत्मौपम्याने मानवेतर प्राण्यांच्या सुखदु:खाशी समरस होण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते. 'परदु:खेनापि दु:खिता विरला' यापलिकडे ते पोचले होते.

टिळकांच्या कवितेत वात्सल्य ओतप्रोत आहे. त्यात ही अपत्यविषयक जबाबदारीची जाणीव दिसते. 'सुशीला', 'माझी ताई', 'चुंबनासारखे औषध नाही', 'एक अमेरिकन मुलगी' इत्यादी कवितांचा जन्म वात्सल्याच्या पोटी झाला आहे. पण टिळक आपले प्रौढपण झटकून मूल होत नाहीत. त्यांनी मुलांविषयी भरपूर लिहिले आहे. तेही 'बालबोधमेवा' हाताशी होते म्हणून. पण मुलांकरिता असे त्यांनी क्वचित लिहिले आहे. त्यांची भूमिका वत्सल पालकाची अथवा प्रेमळ शिक्षकाची असे —

हे फूल पाहत असे उमलावयाला।
हे चंद्रबिंब चढले उदयाचलाला॥
बाहेर अंकुर निघों बघतो द्रुमाचा।
होतो विकास शिशुच्या मृदु मानसाचा॥

अशी त्यांची मुलांकडे पाहण्याची दृष्टी होती. बालकवि ठोंबऱ्यांना सुद्धा 'विसर मला परि अमर्याद जग, राही नित्य जपून' असा उपदेश करण्यास त्यांच्यातला प्रेमळ 'पिता' विसरला नाही.

टिळक समदृष्टी होते. मानवामानवांमधले कोणतेही भेद त्यांना अमान्य होते. ख्रिश्चनांमध्ये सुद्धा जातिभेद असावा याचे त्यांना वाईट वाटे. दुजाभाव त्यांना पसंत नव्हता. मानवता म्हणजे दिव्यता असा त्यांचा भाव होता.

'मी ब्राह्मण वा मी महार गणी न कवणालाच कमी.
या सृष्टींतिल दिव्यपण। तेच तेच हे मनुजपण
मांगल्याची ही ठेव। हीस्तव देइन मी जीव;

टिळक ख्रिस्ती धर्ममताचे असले, तरी भारतीय संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव होता. भारतीयांचे अद्वैत तत्वज्ञान त्यांनी पचवले होते;

'बुद्बुद लहरी बघतांना। म्हणती जन हा उंचपणा!
बुद्बुद लहरी फुटतांना। पुन्हा तयाला नीचपणा!
परंतु जीवन। एक चिरंतन। मजला यांतुन
दावुन किति दमले द्वैता। कारण मी वेडा नुसता!'

या अद्वैत वेदांतामुळे त्यांची जीवनदृष्टी विशाल व व्यापक बनली होती. 'मनोरंजना'ने वसंत अंकासाठी 'वसंता'वर कविता मागितली, तेव्हा त्यांनी उलट विचारले; —

'गुलाबाची फुले रम्य दिसे तैशीच कोन्हाटी.
नुरे भिन्नत्व जे सांचे मनुष्याच्या सदाहाटी
फुले सारीच नक्षत्रे, खडे सारे हिरे होती!
भरे सौंदर्य हे विश्वी भरे नेर्मी, भरें चित्तीं!
अता कोण्या वसंताचे म्हणूं सांगा मला गाणे?
निधीमाजी रमे मासा कशाला तो घडा जाणे?

टिळकांना आपला देश, आपले बांधव, आपले संत महात्मे, त्यांचे साहित्य, त्यांचे तत्त्वज्ञान, आपला इतिहास, भाषा, आपली संस्कृती यांचा अत्यंत अभिमान होता. ते म्हणत, " धर्ममत निराळे असले म्हणजे पूर्वीचे सर्व काही बदलत नाही. ते म्हणतात,—

'माते ! महात्मे तुझे तत्त्ववेत्ते,
तुझे शूर योद्धे तुझे सत्कवी
श्रेणी तयांची सदा माझीया गे !
मना पूजनी आपुल्या वाकवी
आई ! गुरुस्थान अंती जगाचे
तुझे यात शंका न काही जरी
सामर्थ्य नामी तुझ्या आर्यभूमी
तसे पाहिले मी न कोठे तरी !'

त्यांच्या मनावर संस्कारांचा खोल ठसा होता. 'यस्य निःश्वसितं वेदाः'च्या धर्तीवर ते 'ही निःश्वसिते कोण सोडिते ?' असा प्रश्न करतात. 'वन सर्व सुगंधित झाले' याचे कारण ते 'फुल दगडाआड लप.ले' असे सूचित करतात.

'उपनिषदांची धेनू दोही गोपाळांचा राजा।
पिई दुग्ध ते पार्थ, म्हणे, की मोहा! आता जा जा'

असा ते गीतेचा संदर्भ देतात; आणि

" जरा वश कलेवरा करिल जन्मतः भंगुरा, ।
परि तिज न ती धृती मजपुढे ठराया जरा।
विनाशवरी तें मुके नियम नाशहीना जरी।
अहो ! तरुण मी, अहो तरुण मी सदाचा तरी।"

असे आत्म्याचे अविनाशित्व ध्वनित करतात.

आपल्या देशबांधवांचा आणि संस्कृतीचा अनादर करणारांचा त्यांना राग येत असे. 'गोमाजि तिमाजीचा मी जाहलो मजेचा जॉनी' या गाण्यात त्यांनी 'निज जातिबंधु पाहोनी मम पित्त जाय खवळोनी। मी पळतो मागे मागे जन युरोपीय वळखोनी' असा त्यांचा उपहास केला आहे. १९१४ मध्ये युरोपीय ख्रिस्ती राष्ट्रांनी लढाई पुकारली. ती त्यांना आवडली नाही;

" असतिल साथी जगात जितक्या त्याहुन मी घनघोर
मूळ नराच्या हृदयी माझे, नाव तयाचे वैर,
स्वार्थ कोप, अभिमान कलह, बघ माझी सर्व फळे ही
मी मृत्यूचे जीवन केवळ ! माझे नांव लढाई।"

मनुष्याने आपला जन्म लोकसेवेत व्यतीत करावा, सेवेतच जन्माचे सार्थक आहे असे ते मानत.—" मी सेवक, मम पत्नी सेवा। प्रेम लाडका अमुचा छावा ! पुरे ! याच संसारी माझा आत्मा रत व्हावा" अशी त्यांची परमेश्वरापाशी मागणी होती. लोकसेवकांचे गुणानुवाद गाताना ते म्हणतात;—

" लोकहिती पितयाची चिंता।
संवर्धनि ममता मातेची।
धरिती जनपरिचर्याकरितां।
सृष्टीसम समते ॥
जनसेवा ही ईश्वरसेवा।
याविण दुसरा हेतु न ठावा,।
प्रेम आणखी देव दिसावा।
एक सदा ज्यांतें ॥"

टिळक आशावादी होते. त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टी निर्मळ व निकोप होती. उगाच आरडाओरडा त्यांना अमान्य होता;—

" किती वाटले आली गेली।
तरी नाव जी नाही फुटली
दूर जरी तट।
तरि ही बळकट।
का मग बोंबाबोंब ?
गेलो मेलो ठार बुडालो ! ।
क्यो यह बकवा ? 'जय जय' बोलो
नैराश्योद्भव। आशा वैभव।.
का मग बोंबाबोंब ?
होते जे जे, आहे जे जे,।
ते ते स्मृतिगत मात्र विराजे;
काल सनातन,। तसेंच आपण; ।
का मग बोंबाबोंब ?"

असा हा थोर सश्रद्ध आशावादी कविश्रेष्ठ पन्नास वर्षापूर्वी ख्रिस्तदेवांच्या चरणी विलीन होताना म्हणाला;

" झालो वृद्ध अता, कसा फिरु कुठे ?
आणू फुले कोठुनी —
अर्पाया तुज ईश्वरा ?
विसरलो कैसा तुला यौवनी ?
घे घे एक मनःप्रसून उरलें
या देहपात्रासह
वाटो हे तुज वत्सला प्रभुवरा !
अत्यंत सौख्यावह."

———

[नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने]

अनुक्रमणिका

दोन दृष्टि-कोन : १

आहार-संचय करणे आणि आत्मरक्षण करून जिवंत राहणे एवढे शिकून घेतले की तेवढयानेच पशु-पक्ष्यादिकांचे शिक्षण संपूर्ण होते. मग ते आपली जीवन-लीला संपन्न करून घेण्यासाठी तयार झाले, असे होत असते.

पण मनुष्याचे तसे नाही. मनुष्य केवळ जीवधारी प्राणी नाही; तो सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे, जीव-धारणा आणि स्वतःला समाजाला योग्य बनवून घेणे, अशी दोन कामे करण्यासाठी मनुष्याला तयारी करावी लागते.

पण, मनुष्य सामाजिक प्राणी आहे एवढे सांगितले की त्याच्याबद्दल सारे सांगून झाले, असे होत नाही. मनुष्याच्या आत्मस्वरूपाकडे पाहिले असता समाजात त्याचा पत्ता लागणेही कठीण, असे त्याचे स्वरूप असल्याचे दिसून येते. मनुष्याच्या ह्या रूपाकडे जे पाहतात, ते म्हणतात, —

आत्मानं विद्धि

स्वतःला-आत्म्याला जाणून घे !

आत्म्याची ओळख पटणे म्हणजेच मनुष्याची चरम सिद्धी, असे ह्या लोकांनी मानले आहे. जिन्याची खालची पायरी तिच्या वरच्या पायरीच्या तंत्राने वागणारी, तिला अनुगत अशीच असते. सामाजिक प्राण्याच्या बाबतीत त्याची जीवन-लीला-समाज-धर्माला अनुसरून चालत असते. भूक लागली म्हणजे खायचे, ही झाली जीवाची प्रवृत्ती. पण सामाजिक जीवाला आपल्या ह्या आदिकालीन प्रवृत्तीला गौण स्थान देऊनच चालावे लागते. समाजाचा विचार करून पुष्कळदा आपल्या वैयक्तिक क्षुधा-तृषेची उपेक्षा करणे, यालाच आपण धर्म म्हणतो. फार काय पण समाजासाठी आपला जीवसुद्धा देणे, म्हणजे जीव-धर्माचा त्याग करणे सुद्धा श्रेय म्हणून गणले जाते. ह्यावरून, जीवधर्माला संयत करून त्याला समाज-धर्माला अनुकूल बनवून घेणे हेच सामाजिक जीवाच्या शिक्षणाचे मुख्य कार्य आहे, हे आपल्या लक्षात येईल.

परंतु मानवी सत्याला ह्या मर्यादितच आबद्ध करून न ठेवता त्याची परिपूर्णत्वाने उपलब्धी करून घ्यावी अशी ज्यांची इच्छा असते त्यांना, जीव-धर्म आणि समाज-धर्म ह्या दोहोंनाही आत्मोपलब्धीशी अनुगत करून घेण्याच्या साधनेतच खरे शिक्षण आहे असे वाटत असते. एका शब्दात सांगायचे तर, आत्म्याची मुक्ती हेच त्यांना मानवी जीवनाचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे, असे वाटत असते. जीवन-धारणा आणि समाज-रक्षण ह्यांचे सारे लक्ष्य ह्या ध्येयाच्या रोखानेच असते, असे त्यांचे मत आहे.

ह्यावरून दिसते ते हेच की, मनुष्याबद्दल ज्याची जशी समजूत असेल त्याप्रमाणे मनुष्य-प्राण्याची शिक्षण-प्रणाली आखण्याचा प्रयत्न त्याने केला. कारण मनुष्य-प्राण्याला 'मनुष्य' बनविणे हेच शिक्षणाचे कार्य !

प्राचीन संहितांमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधीचे जे आदर्श आढळून येतात ते केव्हापासून आणि कुठपर्यंत ह्या देशात अव्याहतपणे चालू होते त्याचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करणे माझ्या शक्तीच्या पलीकडचे आहे. तरीही, समाजाचे नियंत्रण करण्याचे कार्य जे करीत असते, त्यांची, शिक्षणाच्या उद्दिष्टासंबंधी काय कल्पना होती ते निःसंदिग्धपणे सांगता येईल. माणसाच्या मनुष्यत्वाविषयी त्यांची धारणा कोणती होती, आणि माणसाच्या ठायी मनुष्यत्व

निर्माण करण्यासाठी कोणते उपाय सर्वश्रेष्ठ आहेत असे त्यांना वाटत होते, ते आपण स्पष्टपणे सांगू शकतो.

संसारात कोणतीच गोष्ट नित्य नाही, अतएव संसार असार आहे, आणि त्याचा त्याग करण्यातच श्रेयाची प्राप्ती आहे, अशा प्रकारच्या वैराग्यधर्माच्या श्रेष्ठत्वाचा प्रचार मध्ययुगात युरोपातील साधु-संत करीत असत. त्या काळात संन्याश्यांचा प्रादुर्भाव विशेष होता. युरोपची आजची धारणा निराळी आहे. संसार म्हणजे 'काहीच नाही' असे म्हणून माणसाच्या प्रवृत्तीत आणि निवृत्तीत एक कायमचाच देवासुर-संग्राम सुरू करून ठेवला तर त्यात मनुष्यत्वाचीच हानी आहे, असे ह्या लोकांना आता वाटू लागले आहे. संसाराचे हित साधणे हेच संसारी जीवनाचे अंतिम ध्येय, हीच धर्म–नीति ! त्या धर्म–नीतीला घट्ट पकडून ठेवावयाचे तर, संसाराला 'माया–छाया' म्हणून उडवून लावून काही चालणार नाही. त्या संसार–क्षेत्रात आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत पुऱ्या दमाने काही कार्य करू शकण्यातच खरे वीरत्व आहे. पाठीवर खोगीर असलेल्या अवस्थेतच—म्हणजे, हातातले काम न थांबवितांच–मृत्यू येणे म्हणजे मोठी गौरवास्पद गोष्ट होय, असे आज पाश्चात्य लोकांना वाटत असते.

संसार अनित्य आहे हे विसरून, मृत्यू हा निश्चित ठरलेला आहे ह्या विचाराला मनात थारा न देता, संसाराशी चिरंतन संबंध प्रस्थापित करण्याच्या ह्या प्रयत्नामुळे युरोपच्या जातींना एक निराळेच बळ प्राप्त झाले आहे, ह्यात शंका नाही. ह्याच्या विरुद्ध अवस्थेला ते morbid—म्हणजे रोगट अवस्था म्हणतात. त्यामुळे, जेणेकरून मनुष्य शेवटपर्यंत संसाराच्या कर्म–क्षेत्रात प्राण पणाला लावून झुंजत राहील अशा प्रकारे त्याची वाढ व्हावी हेच विद्यार्थीदशेतील शिक्षणाचे ध्येय त्यांनी ठरविले. जीवन म्हणजे एक संग्राम, असेच ते मानतात. विज्ञानही त्यांना हेच शिकविते. जीविका उपार्जन करण्याच्या लढाईत जे यशस्वी होतात तेच पृथ्वीवर टिकून राहू शकतात, असे विज्ञान–शास्त्र त्यांना सांगते. एका बाजूने, आपल्याला सारे हवेच हवे, नसले तर आपले चालणेच शक्य नाही, अशा प्रकाऱ्च्या, सारे काही वळकावून बसण्याच्या वृत्तीला जोर देण्याचा ते प्रयत्न करीत असतात, आणि दुसरीकडे, हातात असेल ते मुठीत घट्ट आवळून ठेवीत असतात. आटापिटा करून, ओढाताण करून, आपल्या दाहाही बोटांनी मुठीतली वस्तु घट्ट कशी पकडून ठेवावी ते त्यांना चांगले कळते. पृथ्वीचा कोणताही भाग आपण काही केल्या हातचा सोडायचा नाहीच, असे अट्टाहासाने ओरडत, मातीवर दातांचे प्रहार करीत करीत मरून जाणे म्हणजे वीराचा मृत्यू मिळणे, असे त्यांना वाटते. सारे काही आपण जाणून घेणार, सारे काही हिसकावून घेणार, सारे काही आपल्या जवळ ठेवून घेणार, ही त्यांची प्रतिज्ञा ! ती सार्थ करण्याचे साधन म्हणजे त्यांचे शिक्षण.

ह्याउलट आम्ही म्हणत आलो आहोत,—

गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।

मृत्यूने आमची शेंडी आपल्या हातात गच्च पकडली आहे, अशा भावनेने धर्माचे आचरण करा. यूरोपच्या संन्यासी वर्गाने असा उपदेश केला नाही असे नाही. संसारी माणसाला भीती दाखविण्यासाठी त्यांनी साहित्यात, चित्रकलेत, नाना जागी आणि नाना प्रकारांनी मृत्यूच्या बिभीषिकेचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आजच्या प्राचीन संहितांमधे जो भाव दिसून येतो, त्यात एक निराळे वैशिष्टच आहे.

संसाराशी आपला अनंत संबंध आहे अशा बुद्धीने केले गेलेले कार्य चांगले होते की वाईट, तो नंतर करण्याचा विचार झाला. पण ही गोष्ट खोटी आहे यात मात्र शंका नाही. संसाराशी असलेल्या आपल्या साऱ्याच संबंधाला शेवट आहे, हे एक फार मोठे सत्य आहे. आपल्या गरजेसाठी आपण सत्यालाही 'मिथ्या' म्हणून शिवी हासडून आपले काम भागवून घेतले तरी देखील ते आपले काम करायचे तसे करीतच असते. सोन्याचा राजदंड हाच सर्वश्रेष्ठ, असे मानणाऱ्या राजाच्या हातूनही शेवटी तो राजदंड मातीत गळून पडतोच. जगात प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे हेच आपले एकमेव जीवन–कर्तव्य मानणाऱ्या मनुष्याकडे, जीवनाचे सारे प्रयास थंड पडल्यानंतर ह्या जगाला सोडून जाण्याची पाळी येतेच. मोठमोठाल्या कीर्तिमंतांचीही कीर्ती लोपून जाते आणि मोठमोठ्या जातींनाही शेवटी उन्नतीच्या रंगभूमीवरचे दिवे मालवून आपली नाटयलीला

(पुढील मजकूर पान ६७ वर)

पुस्तक परिचय

—चंद्रकांत कुळकर्णी

१

' साहित्य विचार आणि समाजचिंतन '

संपादक — भा. रां. भणगे,

प्रकाशक — ओरिएंट लाँगमन्स लिमिटेड, मुंबई

मूल्य : १५ रुपये

सन १९२० पासून स्वातंत्र्यासाठी व समाज-परिवर्तनासाठी झालेली आंदोलने आणि विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय व सामाजिक जीवन ज्या पिढीने डोळसपणे पाहिले त्या पिढीतील एक समर्थ विचारवंत म्हणून प्रा. गं. वा. सरदार यांचे आदर-पूर्वक स्मरण सर्वांना होईल. ' महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी ', ' संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती ', ' अर्वाचीन गद्याची पूर्वपीठिका ', ' महाराष्ट्र जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या ' इ. पुस्तके त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाची व व्यासंगाची साक्ष देतील.

२ आक्टोबर १९६८ रोजी त्यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने प्रा. सरदार यांच्या मित्रांनी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह साहित्य व समाजजीवन या दोन क्षेत्रातील काही समस्यांचा परामर्ष घेणारा आहे.

' साहित्य विचार ' या सदरात आठ लेख असून ते साहित्याच्या विविध प्रश्नांची चर्चा करणारे आहेत. मने एका मातीची (वि. भि. कोलते), संत वाङ्मयाची भाषा (गो. म. कुळकर्णी), पंचोपासना (दुर्गा भागवत), कालिदास आणि मानवतावाद (वि. म. वेडेकर), ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप (शरच्चंद्र मुक्तिबोध) इ. महत्त्वाच्या लेखांनी हा भाग सजला आहे.

' समाज चिंतन ' या भागात एकंदर तेरा लेख असून या लेखांनी महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांची चर्चा केली आहे. महाराष्ट्रातील समाजवादी विचार (दि. के. बेडेकर), बुद्धिजीवी वर्गातील वैफल्य (नरहर कुरुंदकर), हिंदु मुस्लिम प्रश्न (पन्नालाल सुराणा), समाजसुधारणा व भारतीय स्त्रीजीवन (चित्रा नाईक) हे महत्त्वाचे लेख या सदरात आहेत.

संतजीवनाची फलश्रुती (सुधीर फडके) व ज्ञानप्रसारकांपुढील आदर्श (दि. के. बेडेकर) हे लेख प्रा. गं. वा. सरदार यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा परिचय करून देणारे आहेत.

प्रा. गं. वा. सरदार यांच्या संपूर्ण साहित्याची सूची मु. ग. पानसे यांनी तयार केली असून ती ग्रंथाच्या शेवटी जोडली आहे.

साहित्य आणि समाजजीवन यांतील महत्त्वाच्या समस्यांची उत्तरे शोधणाऱ्या वाचकांना हा विचार-प्रवर्तक ग्रंथ खात्रीने आवडेल. प्रा. सरदार यांना प्रिय असलेल्या विचार–प्रबोधनाच्या कार्यास या ग्रंथाने हातभार लागेल.

२

' बंधुभगिनींनो ! '

(प्रा. वि. प्र. मोहगावकर यांची गाजलेली निवडक व्याख्याने)

लेखक—प्राचार्य वि. प्र. मोहगावकर

प्रकाशक—सौ. इंदुमती मोहगावकर, नागपूर

मूल्य—पाच रुपये

' साहित्यसाधना ' या प्रसिद्ध टीकाग्रंथाचे लेखक प्राचार्य वि. प्र. मोहगावकर यांच्या साहित्यविषयक व्याख्यानांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहात प्राचार्य मोहगावकरानी विविध साहित्यविषयक विषयांवर दिलेली व्याख्याने एकत्र करण्यात आली

आहेत. 'हरि नारायण आणि नारायण सीताराम', 'मृच्छकटिक', 'प्रा. फडके यांची दौलत', 'नवे साहित्य', 'होनाजी बाळा–व्यक्ती आणि वाङ्मय', 'उत्तररामचरित्र', 'ययाति', 'तांब्यांचे मधुघट' इ. महत्त्वाचे वाङमयविषयक लेख या संग्रहात आहेत. प्राचार्यांच्या–वक्तृत्वकलेचे सर्व विशेष त्यांच्या शैलीत आपल्याला आढळतात.

प्राचार्य मोहगांवकरांच्या शैलीचे वैशिष्टच उकलून दाखविणारी डॉ. मा. गो. देशमुखांसारख्या रसिक व मार्मिक समीक्षकाची प्रस्तावना या ग्रंथास लाभली आहे, हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्टच.

मोहगावकरांच्या वक्तृत्वाने जसा रसिक श्रोत्यांना दीर्घकाल आनंद दिला, तसेच हे पुस्तक आनंद व विचारांना चालना देईल.

३

'निवडक ठणठणपाळ'

लेखक—जयवन्त दळवी
प्रकाशक—मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४
मूल्य—बारा रुपये

दर महिन्याच्या 'ललित' मासिकात 'घटका गेली पळे गेली' हे सदर अतिशय लोकप्रिय होत आहे. इतके दिवस या सदराच्या लेखकाचे नाव अज्ञातवासात ठेवल्यामुळे वाचकांची उत्सुकता वाढत असे. नुकतेच एका समारंभात लेखकाचे नाव जाहीर करण्यात आले. या मिस्कील शैलीचे जनक जयवन्त दळवी हे होत. आपल्या मिस्कील शैलीने दर महिन्यात घडणाऱ्या साहित्यिक घटनांवर भाष्य ते या सदरातून करतात. या शैलीत किंचित उपहास डोकावत असला तरी 'केवळ गमतीसाठी गमतीने लिहिलेली गमतीची टिपणे' असे या सदराचे वर्णन करता येईल. या लोकप्रिय सदरातील निवडक टिपणांचा संग्रह म्हणजे प्रस्तुत पुस्तक. गद्य विडंबनाचाच प्रकार. खुसखुशीत, मार्मिक, व बराचसा बुद्धिगम्य विनोद फार दुर्मिळ झाला आहे. त्यामुळे नवीन धर्तीच्या या पुस्तकाचे वाचकवर्ग स्वागत करील. वसंत सरवटयांसारख्या मार्मिक व्यंगचित्रकारांनी या पुस्तकाची सजावट करून या पुस्तकाला अधिक बोलके केले आहे.

(पान ६५ वरून)

पुरी करावी लागते. या साऱ्या फार पुरातन गोष्टी आहेत, पण त्यात काहीही मिथ्या नाही.

सारे संबंध शेवटी संपतात. पण, तसे आहे म्हणून ते संपण्यापूर्वीही ते न मानून चालण्यासारखे नाही. अवसानानंतर जे असत्य, ते अवसानापूर्वी तर सत्य असतेच ना ! जे ज्या परिमाणात सत्य असेल ते त्या परिमाणात जर आपण मान्य केले नाही तर ते आपल्याला आपले कान ओढून मान्य करायला भाग पाडील, नाहीतर, नंतर केव्हा तरी, दुसऱ्या कोणत्या तरी मार्गाने आपले घेणे सव्याज वसूल करून घेतल्याशिवाय राहणार नाही.

आपुले मरण

—'रंगराव'

मरणाला समोरं जाण्याचा तो काही पहिलाच प्रसंग नव्हता. यापूर्वी असे प्रसंग आले होते. अनेकदा आले होते. परंतु तो प्रसंग तसा निराळा होता. अगदीच वेगळा होता.

पूर्वी ज्या ज्या वेळी अशा प्रसंगांची चाहूल लागली त्या त्या वेळी हाती शस्त्र होतं. आपल्या जिवावर कोणी उठलंच तर चार–दोघांना लोळविल्याविना आपण हटणार नाही याची खात्री होती. शिवाय त्या-वेळी मरणं महत्त्वाचं नव्हतं. हाती घेतलेलं काम तडीस नेणं याला महत्त्व होतं. मृत्यू ही बाब केवळ प्रासंगिक, अनुषंगिक होती.

हा प्रसंग मात्र निराळा होता. नुसतंच मरावं लागणार होतं. हातपाय न हालविता, प्रतिकार न करता मृत्यूला समोरं जायचं होतं,–नव्हे, तोच क्षणा-क्षणानं आमच्या जवळ येत होता. आमचा घास घेणार होता. अगदी अलगद–अजगराच्या जवडचात एखादं जनावर ढकललं जावं त्याप्रमाणं !

मरण दूर असतं तोवर त्याची फारशी भीती नसते. ते समोर डोळे वटारून पाहू लागलं म्हणजे मात्र—

मला मात्र विषादच अधिक वाटत होता.

असहायपणे जगाचा निरोप घ्यावा लागणार याचा––

१९४८ चा सप्टेंबर उजाडला तरी आम्ही तुरुंगात होतो.

दोन स्वातंत्र्यदिन आले आणि गेले तरी आमचा बंदीवास कायम होता.

पहिला स्वातंत्र्यदिन हैद्राबादच्या तुरुंगात 'साजरा' झाला. १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत आम्ही जागलो. मानसपूजा करावी तशी स्वतंत्र–भारताच्या ध्वजाला खडी ताजीम दिली. कुसुमा-ग्रजांच्या शब्दांत थोडा बदल करून आम्ही गर्जना केली.

श्वासांनो जा वायूसंगे ओलांडुन भिंत
स्वातंत्र्याच्या राष्ट्रध्वजाला सांगा प्रणिपात—

पुढं हैदराबादला 'भह्या' लोकांची गर्दी वाढू लागली आणि आमची रवानगी गुलबर्ग्याला झाली. तुरुंग कोणताही असला तरी तो सारखाच ! पण, सरकारी खर्चानं हवापालट घडत होती. वरं वाटत होतं. गुलबर्ग्यालाही आमचं बस्तान फार दिवस राहिलं नाही. आमच्यातला एक जण एके रात्री पसार झाला आणि काही 'उनाड' लोकांचं पार्सल रवाना झालं औरंगाबादला. अर्थात् हे सारं आमच्या सुरक्षिततेसाठी !

दुसरा स्वातंत्र्यदिन औरंगाबादच्या हरसूल तुरुंगात आम्ही साजरा केला !

आमच्या बंदीवासाला तेरा महिने झाले होते. महाभारतकालातील पांडव आणि आम्ही यांचं तुलना-त्मक व्यक्तिमत्व लक्षात घेता आम्ही पांडवांसारखंच तेरा वर्षं वनवासी आयुष्य काढलं होतं. तरीही 'पाहे प्रसादाची वाट—' हा आरतीनंतर होणारा अभंग आम्ही आळवीत होतो. स्वातंत्र्याच्या प्रसादाचं वाटप अद्याप निजामाच्या सीमाप्रदेशात सुरू झालं नव्हतं.

पहिल्या स्वातंत्र्यदिनी वाटलं मामला नवा आहे. देश खंडप्राय आहे. आपली प्रसादाची पाळी येईपर्यंत उशीर लागणारच. नाही तरी हैदराबादेहून दिल्ली दूरच आहे की. १९४८ चा ऑगस्ट उलटल्यावर मात्र धीर खचत चालला. आपण पारतंत्र्यात जन्मलो मरणारदेखील पारतंत्र्यात असं सारखं वाटू लागलं—

भरीत भर म्हणजे तुरुंगाबाहेर वाढते अत्याचार होत असल्याच्या बातम्या सारख्या कानावर आदळत होत्या. तुरुंगाच्या दारासारखी दिसणारी चिरफाळचा करून मिळणारी वर्तमानपत्रं आमच्यापर्यंत या बातम्या आणत नसत. परंतु, कपडे, चटण्या, जुनी पुस्तकं यांना गुंडाळून येणारी 'रद्दी' बरीच बोलकी ठरे--

देवाला वाहिलेल्या पोळानं उभं पीक बरबाद करावं तसा प्रकार सर्वत्र सर्रास चालू होता.

प्रतिकाराचं आणि सहन करण्याचंही बळ संपलं होतं. सारी भिस्त 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' यावरच होती ! जगदीश्वरानं आपण निर्विकार आहोत हे सिद्ध केलं होतं.

"मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास" हे दिल्लीश्वराचं रूप प्रतिदिन प्रकट होत होतं--

आम्हाला उत्कंठा लागली होती 'दुजी मूर्ति' प्रकट होण्याची--'कठिण वज्रास भेदू ऐसे' हे विष्णुदासाचं रूप पाहण्याची !

आशा वेडी असते तशीच चिरंजीविनी. पण,--

मध्येच झंझावात सुटला आणि आमच्या आशेचा अत्यंत क्षीण होत चाललेला 'अहेव तंतू' देखील उन्मळून पडला !

१९४८ च्या सप्टेंबरात एक गरम वदंता आदळली :

"लवकरच तुरुंगावर हल्ला होणार : राजवंद्यांना जिवंत जाळणार !"

एखाद्या विजापुरी गोल घुमटात एकाच शब्दाचे अनंत प्रतिध्वनी उठावेत त्याप्रमाणं या वदंतेचे अनेकमुखी पडसाद सर्वत्र पसरले.

वाईट बातमी नेहमी खरीच ठरत असते--

खोटं ठरण्यासारखं त्यात नव्हतंही काही. सारं काही प्रतिपक्षाला अनुकूल होतं.

अन् अगदी खरं सांगायचं म्हणजे आम्ही सारे हबकलो होतो. कोणी बोलून दाखवत होते, कोणी खोटे मुखवटे घेऊन वावरत होते. एवढाच काय तो फरक. अन् हा स्वाभाविक फरक होता : माझं आपलं एक समीकरण आहे : मनातली भीती चटकन् बोलून दाखवितो तो अनुयायी आणि खऱ्या भीतीवर वेदांताचं जरीकाम काढतो तो पुढारी !

'आपणच आपले शत्रू व मित्र आहोत' असं कुठं तरी वाचल्याचं स्मरतं. मला वाटतं आपलं मनच शत्रू आणि मित्र या दोन्ही भूमिका एकाच वेळी वठवीत असतं : कुशल नट "डबल रोल" करतो त्याप्रमाणं--

मन सांगू लागलं ही वदंता खरीच असली पाहिजे. अरे, दहा वर्षांपूर्वी नाही का याच तुरुंगात आर्यसमाजी सत्याग्रहींवर जळते पलिते फेकले होते ! त्यात कोणी दगावलं नाही असं सरकार तेव्हा म्हणालं होतं. खरं सरकारला, परमेश्वराला किंवा बिचाऱ्या दिवंगत जीवांनाच ठाऊक !

गेल्या दहा वर्षांत तर संस्थान या मामल्यात बरंच पुढं गेलं आहे. आता रजाकार सरकारच्या मदतीला आहेत. स्वतःला गैरसोईचं वाटणारं सारं रजाकारांच्या नावावर खपविलं म्हणजे सरकार आपलं मोकळं ! म्हणून आम्हाला 'सद्गती' मिळावी यासाठी अग्निनारायणाला आवाहन करणं त्यावेळी अशक्य मुळीच नव्हतं !

आणि असाच एक दिवस उजाडला. आमचे पहारेकरी त्या दिवशी फारच खुशीत होते--अगदी मस्तीत होते म्हणाना ! गुरांच्या बाजारात खाटीक "माल" पाहतो त्याप्रमाणं सर्व राजबंद्यांचं निरीक्षण त्या दिवशी चाललं होतं. त्यांच्या गप्पांकडे आमचं लक्ष वेधावं याचा ते सारखा प्रयत्न करीत होते. एक-जण सहज आपल्या सहकाऱ्याला सांगत होता : "चलो भाई आज का तो आखरी दिन है कलसे तो इन लोगोंपर पहरा रखने की ड्यूटी खतम होगी."

"लेकिन खाँ लाशों को पूरी तऱ्हा गाडने तक तो पहरा देनाच पडेगा."

सायंकाळी जेवणं झाली. नळावर थाळ्या धुणं, रात्रीसाठी पाणी भरून घेणं ही कामं चालली होती. बराकीत बंद होण्यापूर्वी आम्ही एकमेकांना पाहून घेत होतो. अफवा खरीच ठरली तर आम्ही सारे निराळ्या जगात भेटणार होतो.

पाहारेकरी मात्र रंगात येऊन गप्पा ठोकत होते. थोडी रिकामी घागर डोक्यावर घेऊन जाताना पाण्या-

अनुक्रमणिका

च्या हेलकाव्याने ध्वनी निघतो तसे लेकाचे पोट धरघरून खिदळत होते.

"चलो, आखरी खाना तो खा लिये बेचारे!"

"हां भाई, कल दिन निकलतेही फैसला है ना हम लोगोंका. कल अलस्सुभा कत्लेआम करने का हुक्म हुवा है."

"रेडिओ सुना खाँ आज."

"नहीं भाई"

"अरे सुनना था यार! पाकिस्तान की फौज देहली जा रही है. सिर्फ पचीस मील तै करना है!"

"तो बोलो कल सुभा तक देहली फतेह होगी!"

"हां उधर देहली पर कब्जा इधर काफिरोंका कत्ले आम!"

"इनको तो पहलेही जुवा करना था यार! खामखाँ खिलाया इतने दिन."

"अरे बकरीको नहीं खिलाइंगे तो गोश्त कैसा निकलेगा!"

रखवालदारांच्या या गप्पा म्हणजे तर कित्येक दिवसांच्या अफवांवर शिक्कामोर्तबच होता.

बंद बराकीत भीषण शांतता होती.

झोपणं शक्य नव्हतं. बोलणं अशक्य होतं.

मरणाला अक्षरशः रात्र आडवी होती तर!

जगातली ही शेवटची रात्र--

आता फक्त काही तासच जगायचं होतं नंतर--

अग्नि, ज्वाला, धूर, धूरच धूर

* *

"गुरू, फार धूर होतोय्. बघाना जावईबापूंच्या डोळ्यांना सारखं पाणी येतय्. थोडं तूप टाका म्हणजे पेटतील समिधा."

"अहो धूर होणारच, डोळ्यांना पाणी येणारच. हे असं चालायचंच. आधी कष्ट, मग फळ!"

"अहो पण, फळ पदरात पडलय् त्यांच्या, आता का कष्ट देता?"

"बाकी काही म्हणा, धूर लागतोय् दोन डोळ्यांना. पण, पाणी मात्र चार डोळ्यांना येऊ लागलय्."

* *

"असं सारखं काय पाहता? माझ्या डोक्यावर शिंगबिंग उगवलय् की काय आजच लग्न झालंय् तसं!"

"हूँ."

"हूँ काय? बरं तरी दिसलं पाहिजे?"

"बरं दिसतय् म्हणूनच बघतोय्"

"काही तरीच!"

"तसं नाही. ज्ञानेश्वरीत म्हटलं—"

"आताच नका सांगू मला ज्ञानेश्वरी. खूप अवकाश आहे त्याला. सुना–जावई आल्यावर ऐकेन. आज ज्ञानेश्वरी नको."

"ऐकून तर घेशील. ज्ञानेश्वरीत असं म्हटलं आहे—"

"साऽरखं वायकोकडं पहात बसावं—"

"नाही ग, ज्ञानेश्वरीत म्हटलं आहे—

"तंव हरु म्हणे हे नेणिजे। जैसे का रुप तुझे। तैसे हे देखिजे नित्य नवे—"

"म्हणजे?"

"कितीदा पाहिलं तरी शंकराला पार्वतीचं रूप प्रत्येक वेळी नवेच दिसत असे. तसं—"

"चला काही तरीच!"

* *

"अगदी खरं सांगाल?"

"कधी खोटं बोललोय् तुझ्या जवळ?"

"पुन्हा नाही ना जाणार मला सोडून, कध्धी अगदी कध्धी सुद्धा?"

"आता कामच पडणार नाही तुरुंगात जायचं. युद्ध संपलय् आणि ब्रिटनचं सामर्थ्य देखील. आज ना उद्या स्वराज्य मिळणारच?"

"बरं झालं बाई. प्रश्नच मिटला म्हणायचा!"

* *

अनुक्रमणिका

"काही म्हणा पंत. अगदी दृष्ट लागण्यासारखा प्रपंच आहे तुमचा. मुलगा उद्या एल्‌एल्. बी. होऊन हाताखाली आला की तुम्ही निर्धास्त. तेवढं जावई-बापूचं मात्र— "

"हं ऽ ऽ काय करता नानासाहेब. नशीव काही कुणाचं धुवून पाहता येत नाही. चांगला होतकरू दिसला, शिकलेला आहे, म्हटलं नसेना का इस्टेट. दिली मुलगी. अन् त्यांना आठवले झालं भिकेचे डोहाळे— "

"जाऊ द्या हो, कन्या देउनिया कुळ मग काय विचारावे? घरंदाज पोरगा अशा वाटेला गेला नसता. नशीव झालं आपल्या पोरीचं. नशीव, केवळ नशीव!"

* *

कपाळभर कुंकू, लखलखित कांती, आहे तरी कोण ही?

हे काय स्वप्न समजायचं की साक्षात्कार?

भारतमातेचा की आई जगदंबेचा? की—

काही तास तर जगायचय्—उपयोग काय या साऱ्याचा?

नंदिनी क्षमा कर. मी अपराधी आहे. एका मार्गाला लागलो, तुझ्याकडे अक्षरशः पाठ फिरविली. अन् आता—

हे काय! कुंकूच तेवढं ठसठशीत दिसतंय्—

फिरकी फिरल्यासारखं हे आहे तरी काय?

प्रकाश—निखळ प्रकाश—

* *

सरत्या जीवनाचे हे सारे आभास.

सत्य एकच आहे: उजाडण्यापूर्वी आपण—

"खुष रहो अहले वतन हम तो सफर करते हैं—

मुल्क रहे शाद ओर आबाद। हमारा क्या हम रहे न रहे—"

* *

डमडमत डमरु ये खणखणत शूल ये

शंख फुंकीत ये, येई रुद्रा—

पाड सिंहासने दुष्ट ही खालती...

खणखणत शूल ये, खणखणत शूल ये—

* *

खण् खण् धडल् धम्—

हे काय?

"महात्मा गांधी की जय, इन्किलाब जिंदाबाद—"

आले वाटतं—

तयार झालंच पाहिजे ..

धडल्, धम्—ऑं—हा थाळ्यांचा आवाज—

छे, छे, तयार झालंच पाहिजे,

हरि ॐ—ऊर्ध्वमूलमधःशाखम्।

काही तरी वेगळाच आवाज येतोय—"इन्किलाब जिंदाबाद"

अगदी शेवटच्या क्षणी सुद्धा—

अरे मरू द्या की शांततेनं—

अश्वत्थं प्राहुरव्ययम्।

धडल् धम्—खण्खण्

छंदांसि यस्य पर्णानि—

अनादि मी अनंत मी अवध्य मी भला—

मारिल मजसि कोण असा रिपु जन्मला!

"इन्किलाब जिंदाबाद!"

दाराजवळ धडपडतायत सारे—

आहे काय!

"पं. नेहरूकी जय!"

अरे, हा तर जेलरच येतोय्—बेटा मद्रासी लुंगी नेसलाय्—

"भाइओ, आपकी जीत रही, हिंदुस्थानी फौजोंने औरंगाबाद काबिज कर लिया है—"

आश्चर्य, सारेच आश्चर्य!

विश्वासच बसत नव्हता. जेलर ओरडून सांगत होता—"गुरखों ने जेल को घेर लिया है—फौजी अफसर आरहे हैं—"

"पं. नेहरू की जय, सरदार पटेल की जय!"

अन् 'कत्ले आमचं' झालं काय?

"नींद नहीं गई मियाँ, अरे नाचो यार जीत हुई—"

शिवप्पानं मला खांद्यावर उचलून घेतलं.

शंकरानं तांडव करावं तसा तो नाचू लागला--

चक्कर आल्यावर सारं वातावरण फिरल्यासारखं वाटावं तसं काही तरी वाटत होतं—

"धडल् धुम्, खणण् खण्. महात्मा गांधी की जय !"

गंगाचरणला विचारलं,—"अरे कत्ले आम होने वाला था ना ?"

"छोडो यार--कत्ले आम बाहर हो रहा है यहाँ नहीं—"

"अब तो नई जिंदगी, नई रोशनी, स्वतंत्रता का प्रकाश."

* •

बराकी खूप उशीरानं उघडल्या.

आम्ही बाहेर आलो. एकमेकांना कडकडून भेटलो.

मरून जिवंत झालो. पुनर्जन्मच म्हणा ना !

बुरजावर गुरखे छोटचा बंदुकी घेऊन पहारा करीत होते. कालचे पहारेकरी खूप उशीरानं आले—

"क्या हजरत कतले आम होनेवाला था ना ?"

"सरकार क्युं शरमिंदा करते हैं, मरे हुए पर क्युं गोली चला रहे हो ?"

"क्युं भाई, क्या हुआ खैरियत तो है !"

"सरकार, हम पेटके बंदे. कमीना हरामजादा कासिमरजवी हमको बहकाया. हम भी भटक गये. सत्यानास कर दिया हरामजादेने. हमको कहीका न रखा."

"अच्छा."

"अल्लाकसम सरकार, हमको पताही नहीं था ये हरामजादा हमको गढ्ढे में उतार देगा—"

कालची गुर्मी पार उतरली होती. कबरीतून उकरून काढावेत असे एकेकांचे चेहरे दिसत होते--

"सरकार दो जूते मारो. आपही कहिए हमने कभी गुश्ताकी की आपसे, कभी उंगली उठाई ?"

"सरकार मजबूर थे मज्लूम थे, पेट के गुलाम थे."

"बालबच्चेवाले हैं, सरकार रहम करो. बस्स आपके रहमपरही जीना है—"

"पेटके बंदोंपर मेहर करना सरकार. आपही बचा सकते हैं हमको--"

आणखी बरंच काही तरी बरळत होते लेकाचे-

वेळ होता कोणाला लक्ष द्यायला.

सारा तुरुंग नुसता दणाणून गेला होता.

मुक्त जीवन फेसाळून आलं होतं.

क्षीण कुडीत चैतन्य उसळत होतं.

मंद डोळे तेजानं ओसंडत होते.

दुबळचा शरीराला बारा हनुमंताचं बळ आलं होतं.

संत तुकारामाचं वचन जिभेवर घोळत होतं —

"आपुले मरण पाहिले मी डोळां—"

अनुक्रमणिका

एक वटवृक्ष कोसळला

--पुरुषोत्तम दारव्हेकर

१३ जून १९६९ ! महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासातला एक अशुभ दिवस ! अमंगल तिथी !

कारण त्या दिवशी महाराष्ट्राच्या सारस्वतातला आणि समाजजीवनातला एक विशाल वटवृक्ष उन्मळून पडला. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे भारदस्त नामाभिधान धारण करणारा एक सह्याद्रीचा उत्तुंग कडा धरणीमातेच्या अंकावर विसावला. एक प्रबल झंझावात शांत झाला . . . कायमचा ! सत्तर वर्षे सतत धगधगत असलेले एक अभूतपूर्व यज्ञकुंड विझून गेले ! 'प्रल्हाद' असूनही 'नरसिंह' झालेला एक 'हंसणारा सिंह' निद्राधीन झाला ! चिरनिद्राधीन झाला !

परंतु हे घडणार नव्हते. घडायला नको होते. 'शतायुषी' होणे ही अत्र्यांसाठी अशक्य गोष्ट नव्हती. त्यांना काहीच अशक्य नव्हते, असाध्य नव्हते. त्यांच्या मनातच असते तर वयाची शंभरी पूर्ण करून स्वतःचा मृत्युलेख स्वतःच आपल्या आवडत्या 'मराठा'त प्रसिद्ध करून वाजत गाजत त्यांनी इहलोकाचा निरोप घेतला असता.

'अत्रे' आणि 'मृत्यू'? छे! हे दोन शब्द जवळ येणारच नव्हते. अत्रे म्हणजे प्रचंड गर्दी ! अत्रे म्हणजे वक्तृत्वाचा गदारोळ ! अत्रे म्हणजे हंशा आणि टाळ्या यांची बरसात ! अत्रे म्हणजे दैनिक 'मराठा' मधून सतत गर्जत असलेली मुलुख मैदान तोफ ! अत्रे म्हणजे सामान्यांचा असामान्य कैवारी असलेला गतिशील लोकनेता ! अत्रे म्हणजे नाटकांचा महामूर महापूर ! अत्रे म्हणजे . . . . .

— परंतु अत्रे आणि मृत्यू ? छे ! छे ! हे अतर्क्य, असंभव ! हे होणार नव्हते. व्हायला नको होते. हा 'आल्हादमार्गी प्रल्हाद', आम्हाला अजून काही वर्षे हवा होता. लेखणीची तलवार आणि वाणीची तोफ करून संयुक्त महाराष्ट्रासाठी झुंजारपणे लढलेला हा विजयी योद्धा इतक्या लवकर 'यमधानीच्या 'जवनिकेआड' जायला नको होता. अजून महाराष्ट्राची गोमंतकाशी भरतभेट व्हायची राहिली आहे ! बेळगाव–कारवारचा सीमा–प्रश्न राहिला आहे. विदर्भाच्या काही व्यथा अजून दूर करायच्या राहिल्या आहेत ! 'मराठी रंगभूमीला बाळसे आले आहे की केवळ सूज' ह्या दुष्ट शंकेचे निर्मूलन व्हायचे आहे. मराठी चित्रपटसृष्टीला आलेली मरगळ दूर करण्यासाठी भगीरथ–प्रयत्न करण्याची आवश्यकता उरलीच आहे. अखिल भारतीय पातळीवर मराठी माणसांचा अनेकदा अकारण तेजोभंग होतो, मानभंग होतो -- त्या व्याधीचे निराकरण करू शकणारा महाराष्ट्राचा बलदंड प्रवक्ता आम्हाला हवा आहे ! . . . . आणि अशा वेळी . . . नेमक्या ह्या कसोटीच्या घडीला अत्रे निघून गेले . . . कधीही भरून येणार नाही अशी प्रचंड पोकळी निर्माण करून ! आयुष्यभर ज्याने लोकांना खदखदून हंसायला लावले . . . . त्यानेच अखेर असे रडवावे ? नियतीचा विनोद क्रूर असतो हेच खरे !

—१३ जून १९६९ ! त्या दिवशी "जितं मया" म्हणत मृत्यू खदखदून हसला असेल. यमदूत थयथया नाचले असतील .. कारण त्यांचा अभूतपूर्व विजय झाला होता ! एकाच मृत्युपाशात, एकाच वेळी तेरा बळी त्यांना गवसले ! कारण अत्रे ही एक व्यक्ती नव्हती...अनेक व्यक्तिमत्वांचा समुच्चय होता तो. मृत्यूने एकच पाश टाकला आणि विलक्षण शिकार

साधली. एकाच घडीला अनेकांची पारध झाली. कारण अत्रे 'एक' असूनही अनेकरूपी होते. त्यांच्या मृत्यूमुळे 'अत्रे मास्तर' नावाचा परिश्रमी, सततोद्योगी, बालकांवर प्रेम करणारा शिक्षक आणि शिक्षणशास्त्रज्ञ आमच्यातून निघून गेला. 'केशवकुमार' नावाचा भावुक कवी हरपला ! "झेंडूची फुले" उधळून मराठी भाषिकांना 'निकोप विडंबन' दृष्टी देणारा विनोदपंडित आम्ही गमावला. बुडत्या रंगभूमीला तारून, रंगमंचावर हास्यरसाचे कारंजे उडविणाऱ्या करुणरसाचे अश्रुसिंचन करणाऱ्या समर्थ, समृद्ध आणि संपन्न अशा प्रतिभाशाली नाटककाराला आम्ही मुकलो. समाजाची दुःखे वेशीवर टांगून, राजसत्तेला दहशत बसविणारा, दुर्बलांचा त्राता आणि अत्याचारी प्रवलांचा दमनकर्ता असा झुंजार पत्रकार आम्ही गमावला. साहित्याच्या विविध क्षेत्रात लीलया संचार करून मराठी सारस्वताला बहुरंगी, बहुढंगी बहार आणून फुलविणारा, सिद्धहस्त, सव्यसाची साहित्यिक आपल्या बहुप्रसवा लेखणीला चिरविश्रांती देऊन दृष्टीआड झाला. हजारो श्रोत्यांच्या प्रचंड सभा–संमेलनातून आपल्या घणाघाती वक्तृत्वाने जनशक्तीला चेतवू शकणारा, मर्मभेदी प्रहारांनी विरोधकांना जमीनदोस्त करणारा, आपल्या विनोदीशैलीने गर्दीला खदखदून हसविणारा एक हजरजबाबी, हरहुन्नरी, प्रासादिक वाणीचा, 'दशसहस्रेषु' असा धिप्पाड व्यक्तिमत्वाचा वलदंड वक्ता व्यासपीठावरून कायमचा निवृत्त झाला. कै. साने गुरुजींनी गाइलेले 'श्यामची आई' हे मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र, रूपेरी पडद्यावर अंकित करून भारताचे पहिलेच राष्ट्रपतिपदक आत्मविश्वासाने प्राप्त करणारा चित्रपट–निर्माता, पटकथालेखक, दिग्दर्शक असा अष्टपैलू कलावंत भर मैफलीतून उठून गेला. समाजहितासाठी आणि मराठी भाषेसाठी तन–मन–धन झिजविणारा युयुत्सू वृत्तीचा, निरलस समाज–कार्यकर्ता पहाता पहाता दिसेनासा झाला. जीवनात सारे भोग आणि उपभोग रसील्या वृत्तीने, रंगेल आणि रगेल शैलीने भोगूनही निलप राहिलेला, निर्मत्सरी, प्रसन्न असा 'आनंद–मार्गाचा' एक रसिक, जिज्ञासू यात्रिक, आपली चैतन्याने रसरसलेली भ्रमणयात्रा संपवून समाधिस्थ झाला. दिवसभर खेळून–हुंदडून थकलेले–एक सत्तर वर्षांचे निरागस मूल आईच्या कुशीत विसावून गाढ झोपी गेले.

—शिक्षक, शिक्षणशास्त्रज्ञ, कवी, विनोदपंडित, नाटककार, पटकथाकार, निर्माता, दिग्दर्शक, नट, वक्ता, साहित्य–सेवक, समीक्षक, कार्यकर्ता, राजकारणी नेता आणि झुंजार पत्रकार...आणि तरीही आचार्य अत्रे उरतातच ! त्यांचे 'संपूर्ण चित्र' या विशाल चौकटीतही मावत नाही. या अनेकविध भूमिका व्यापूनही ते 'दशांगुले' उरतातच.

––म्हणूनच यमदूतांना हर्षोन्माद झाला असेल. तेरा तारखेला त्यांनी एकच प्रहार केला आणि तेरा बळी घेतले. कदाचित त्याहून जास्त कारण 'अत्रे' एक नव्हते अनेक होते ! एकएका क्षेत्रातील त्यांचे स्वतंत्र कर्तृत्व विचारात घेतले तर वाटू लागते हे केवळ एका व्यक्तीचे कार्य नसावे. साहित्य, रंगभूमी, चित्रपट, व्यासपीठ, पत्रव्यवसाय, राजकारण, समाजकारण ह्या एकेका क्षेत्रातले त्यांचे कार्य इतर कुणी करायचेच ठरविले तर एकेक जन्म वेचावा लागेल. 'अत्रे' गेल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढायला पुन्हा 'अत्रे'च हवेत. परंतु असा माणूस शतकातून एखादाच अवतरणार.

––आचार्य अत्रे यांच्या पहाडासारख्या देहातून पंचप्राण काढून घेताना, साक्षात मृत्यूला देखील मोह झाला असेल उद्गारण्याचा, "असा मृत्यू गेल्या हजार वर्षांत झाला नसेल !"

––आपण 'अत्री–कुलोत्पन्न' आहोत याचा आचार्य अत्र्यांना विलक्षण अभिमान होता. स्वतःला 'आत्रेय' म्हणवून घेण्यात त्यांना भूषण वाटावयाचे. 'दत्तात्रेय' हे अत्री–कुलाचे आद्य दैवत. ह्या दत्तात्रेयाबद्दल एका संस्कृत श्लोकात म्हटले आहे––

दत्तात्रेयो हरिः कृष्णः उन्मादी नंददायकः ।
मुनिर्दिगंबरो बालः पिशाचो ज्ञानसागरः ॥

ह्या श्लोकातली 'उन्मादी', 'नंददायक', 'बाल' आणि 'ज्ञानसागर' ही चार विशेषणे विशेष लक्षणीय आहेत. कारण आचार्य अत्र्यांच्या सतत धावत्या जीवनप्रवाहात ह्या चार 'वृत्तींना' एक वेगळाच अर्थ प्राप्त

झाला होता. अत्रे म्हणजे महाराष्ट्राने स्वतःलाच घातलेले एक कोडे होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात अनेक परस्परविरुद्ध वृत्तींचा आणि शक्तींचा संगम होऊन एक अभूतपूर्व रसायन तयार झाले होते. म्हणूनच त्यांच्या सर्व गुण-दोषांसह महाराष्ट्राने त्यांना 'आपला' मानले होते; त्यांच्या 'सार्वभौमत्वाला' मान्यता दिली होती; लोकजीवनातले 'सम्राटपद' त्यांना बहाल केले होते. 'बाळ गंगाधर' टिळक, 'बालगंधर्व' राजहंस आणि नाटककार गडकरी 'मास्तर' ह्या तिघांवर महाराष्ट्राने अपरंपार प्रेम केले. त्या परंपरेत मानाचे स्थान मिळालेली गेल्या अर्ध शतकातली एकमेव व्यक्ती : आचार्य अत्रे !

